

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.
काव्य
ता. १-१-८४
REFBK-0004949
-भवानीशंकर श्री. पंडित-

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ
सं. कार्य. नं. १०५८
ता. १-१-३४
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०५८
ठाणे.

# पिचलेला पावा

# पिचलेला पावा

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. क्र.
ता.
ठाणे

[ निवडक भावगीतांचा संग्रह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

REFBK-0004949
REFBK-0004949

—भवानीशंकर श्री० पंडित

प्रकाशक :
भवानीशंकर श्रीधर पंडित, एम्. ए.
धनतोली,
नागपूर.

[ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन ]

मुद्रक :
मंगेश नारायण कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई २.

# — अनुक्रमणिका —


| अ.क्र. | कवितेचें नांव | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | अंतरंग उघडतांना— | १ |
| २ | जन्मभूमिप्रशस्ति | २ |
| ३ | हंगामांत !— | ४ |
| ४ | तारूं | ६ |
| ५ | येणार कोण तरि आज ? | ७ |
| ६ | सौंदर्यासक्ति | ९ |
| ७ | न्यायासनासमोर— | १० |
| ८ | उत्कट प्रेम | ११ |
| ९ | शापाकुल देवता | १२ |
| १० | उषा आणि संध्या | १३ |
| ११ | स्वप्न | १४ |
| १२ | नृपतिनंदिनी | १५ |
| १३ | कसें होईल ? | १७ |
| १४ | गोफण मारणारास— | १८ |
| १५ | एकदां | २० |
| १६ | बुरखेवाली | २१ |
| १७ | सौंदर्योपासना | २३ |
| १८ | नजरभेट | २४ |
| १९ | स्वरूपसुंदरी | २६ |
| २० | प्रतीक्षा | २८ |
| २१ | हृदय मृणालिनि ! इ० | २९ |
| २२ | लेंढ्रा रस्त्यावरील सायंकाळ | ३० |
| २३ | प्रबोधन | ३२ |
| २४ | नदी आणि पाषाण | ३४ |
| २५ | प्रणयवंचितेची इच्छा | ३६ |
| २६ | मातेच्या निकटीं— | ३७ |
| २७ | पुष्पकेतन | ३८ |
| २८ | तापीपूर्णासंगमावर— | ४० |
| २९ | निद्रित कलिका | ४१ |
| ३० | सौ० ताईचा राजा | ४३ |
| ३१ | कृतज्ञतेचे अश्रु | ४५ |
| ३२ | धीवरकन्या | ४६ |
| ३३ | गडे ! लाजना | ४८ |
| ३४ | विधवेचें आत्मसमर्पण | ५० |
| ३५ | अपांगदर्शन | ५२ |
| ३६ | मनीषा | ५३ |
| ३७ | दिवंगता जननीस— | ५५ |
| ३८ | लवतेया लव लव ईज | ५६ |
| ३९ | तुझे कर्णपूर | ५७ |
| ४० | वाक्प्रहार | ५८ |
| ४१ | पाळत | ५९ |
| ४२ | चित्रलेखा | ६० |
| ४३ | तीन कला | ६१ |
| ४४ | वाहतुकी | ६२ |
| ४५ | सविकल्प समाधि | ६३ |
| ४६ | माधवी व रसाल | ६४ |

| अ.क्र. कवितेचें नांव | पृष्ठांक |
|---|---|
| ४७ निद्रागीत | ६६ |
| ४८ क्षमस्व ! | ६७ |
| ४९ बळूची तरुणी | ६८ |
| ५० महदंतर | ७० |
| ५१ पुण्यस्मृति | ७१ |
| ५२ कविवर्य तांबे यांची कविता | ७२ |
| ५३ गांधर्व | ७३ |
| ५४ अलंकार | ७४ |
| ५५ नको जाऊं | ७५ |
| ५६ निरोपापूर्वी— | ७६ |
| ५७ मधुरमीलन | ७७ |
| ५८ वरपरीक्षा | ७८ |
| ५९ उन्माद | ७९ |
| ६० वंचना | ८० |
| ६१ मुग्ध कलिकेप्रत— | ८१ |
| ६२ स्मृति | ८३ |
| ६३ याचना | ८४ |
| ६४ मीनाक्षी | ८५ |
| ६५ वंचिता | ८६ |

| अ.क्र. कवितेचें नांव | पृष्ठांक |
|---|---|
| ६६ संगमोत्सुक | ८७ |
| ६७ तुझा सहवास | ८८ |
| ६८ शाश्वत भेट | ८९ |
| ६९ कुलीनता | ९० |
| ७० निराशा | ९१ |
| ७१ भिकारी | ९३ |
| ७२ विपरीत वर्तन | ९४ |
| ७३ शंकाकुल पार्वतीबाई साहेब पेशवे | ९५ |
| ७४ प्रेमयोग | ९८ |
| ७५ मुग्धा | १०० |
| ७६ युवक | १०२ |
| ७७ हृदयपरीक्षा | १०४ |
| ७८ शाश्वत प्रीति कीं अशाश्वत प्रणय ? | १०५ |
| ७९ कळी खुडणारास— | १०६ |
| ८० ऐकांतिक प्रेमिकास— | १०८ |
| ८१ निश्चिति | ११० |
| ८२ सागरसंगीत | ११२ |
| ८३ श्री महाराष्ट्रशारदेस— | ११५ |

माझे परमपूज्य पितृव्य

प० वा०

## दत्तात्रेय विनायक पंडित

यांच्या

**—पुण्यस्मृतीस—**

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ठाणे.

पुष्कळ वर्षांपासून हृदयाशीं बाळगलेली स्वतःची अनिवार हौस, अनेक स्नेहाळ सोबत्यांचा सतत आग्रह आणि कांहीं प्रेमळ चाहत्यांची कौतुकेच्छा म्हणून हा कविताकलाप आज प्रसिद्ध करीत आहें. यांत माझ्या आजतागायतच्या सर्व कविता समाविष्ट झालेल्या नाहींत. मर्यादित पृष्ठसंख्येमुळें कांहीं निवडक गीतांचाच अंतर्भाव होऊं शकला. रसिक शारदोपासकांना माझी ही अल्प कृति रुचेल अशी अपेक्षा आहे.

प्रस्तुत कवितासंग्रहाच्या अमूर्त कल्पनेपासून तों तिला मूर्त स्वरूप प्राप्त होईपर्यंत मला माझ्या असंख्य स्नेह्यांचें निरपेक्ष साह्य झालें आहे. त्या सर्वांची नांवनिशी साभार प्रसिद्ध करण्याच्या औपचारिक विधीपेक्षां त्यांचें कृतज्ञतापूर्वक मनांत स्मरण करणें मी अधिक श्रेयस्कर समजतों.

भ० श्री० प०

धनतोली, नागपूर.
नोव्हेम्बर, १५।१९३३.

प्राज्ञ ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. ........ नं. ....
ता. ....



# अंतरंग उघडतांना—

ग्रंथ संग्रहालय (जीवनपुरी) स्थळ प्रत
ता.
ठाणें.

अंतरंगकमल खुले
नटती नव भावदलें

अविकच हें आजवरी
लपत मुग्धवृत्तिसरीं
विकसित हो आज परी
स्फूर्तिसहज तेजबलें

ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे.

यास वर्णवायुलहरि
कुरवाळिति कोमल करिं,
अभिषिंचिति वरचेवरि—
नेत्रजनित मोदजलें

याचा लवमदिर गंध
दश दिशांस बनवु धुंद !
सेवाया मधु मरंद—
जुळुत रसिकभृंगकुलें !

नागपूर, १२।१०।३३

ग्रंथ संग्रहालय

# जन्मभूमिप्रशस्ति

[ भूप ]

नमन साष्टांग जनि ! न्यायनयशालिनी
ज्ञानविज्ञानखनि धान्यधनपालिनी

शारदारूपिणी संपदाधारिणी
शत्रुगणमर्दिनी मित्रजनवर्धिनी
दु:खभयशोषिणी मोदसुखपोषिणी
सुमतियशदायिनी मंगला विजयिनी

झळझळे 'हिम' मुकुटिं, मेखला 'विंध्य' कटिं
कच्छबंगालजुटि अंगदें बाहुवटिं
पूजि पद रत्नपुटिं 'कुमरिकन्या' नटी
विनयनत शोभिनी चरणिं 'लंका' गुणी

उरिं रुळे चकचका सरिदुदकमालिका
चमकुनी लखलखा दिपवि देवादिकां
कुंज विलसे निका गाति शुक, सारिका
अब्धि, नद, निर्झरिणि आळविति रागिणी

वीर 'पृथ्वी'परी कोण पृथ्वीवरी ?—
वा प्रतापी तरी त्या 'प्रतापा'परी ?
पाठ पुरवी अरी 'छत्रपति' अभय तरि !
'रणजिता'सम रणीं नरमणी का कुणी ?

वीरतेचे धडे आज 'गुरखे' पुढें
'राजपुत', 'बागडे', 'शीख'ही फाकडे
ताजिमेला खडे 'मावळे' नागडे
शौर्य निज दाउनी धन्य झाले जनीं !

तूंच गे धर्मभू तूंच गे कर्मभू
तूंच गे ज्ञानभू तूंच गे मानभू
तूंच सर्वस्व भू तूंच विभु जन्मभू
टाकुं तुजकारणीं काय कुर्वंडुनी !

अजमेर, २५।४।२३

---

# हंगामांत !

[ देस ]

वलज हें हले गे ! सळसळुनी
कलगान झरी करि झुळझुळुनी

मारुत फुंकी शीळ बनांतुन
अलक चुंबिती मधु हसितानन
अंचल वरिवरि उडे भेदरुन
किति सावरशिल तो फिरफिरुनी ?

एकलीच तूं पिकें कापिसी,
गवताचे तूं भारे बांधिसि
आणि तयाच्या रचिसी राशी
गे ! खपसि इथें तूं गुणगुणुनी

गुणगुणसी किति मधुरालापें !
करीं सारखें चाले खुरपें
किंकिणि नादति भानचि हरपे–
छेडिती लकेरी रुमझुमुनी

तुझा मनोरम मधुर मधुर स्वन
काय त्यापुढें कोकिलकूजन !
वाटे नीरस अलिचें गुंजन !
विरमोनी बुलबुल लपे वनीं ! ! !

खुलवी तव छबि कोमल रविकर
तरू उधळिती फुलें मनोहर
पातीं डुलुनी मधेंच सादर
भेटती प्रमोदें कडकडुनी

हृदयंगम श्रुतिमोहक गीती
नितांत मंजुळ ताना झरती
खळबळ खळबळ हृदयीं करिती
सूर सूर विरघळती श्रवणीं

अजमेर, १९।५।२३

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. नं.
ता.
ठाणें.

# तारूं

[ नैय्या बही जात ]

तारूं कसें तारुं ?

फुटकें जरासेंच
माझें मला हेंच
लागे पथीं ठेंच
कैसें सुधारूं ?

वेगें पुढें जात
धांवें प्रवाहांत
देऊं कुठें हात ?
कैसें सहारूं ?

झोतावरी झोत
झंझावितो वात
घोटाळतें त्यांत
कैसें निवारूं ?

उलटे, सुधे फेर
गिरगीर चौफेर
घेतां कैसें स्वैर
बाजूस सारूं ?

अंधार या पार !
अंधार त्या पार !!
फुटलें बुडीं पार !!!
कैसें हकारूं ?

गात्रीं नसे त्राण
नेत्रीं वसे प्राण
लाचार हैराण
सारे उतारूं !

मी हीन, मी दीन
पायीं प्रभो ! लीन
हाका तुझ्यावीण
कोणास मारूं ?

जोधपूर, १७।६।२३

# येणार कोण तरी आज ?

[बिजली जशि चमके]

" येई न आज कशि नीज ?
लखलखे नेत्रिंची वीज !
करितात ओठ कुजबुज
सांगण्या कुणाला गूज ?
गालांत थरारे लाज !
येणार कोण तरि आज ?

का फुले प्रमोदें ऊर ?
वरि थरारती हे चोर !
कोणती मना हुरहूर ?
हा चडे कुणास्तव साज ?

कुणिकडे लागती डोळे ?
का जीभ बोल नच बोले ?
तिळभरी न पाउल हाले ?
कोणती दिसे अशि मौज ?

या अशा रातिंबेरातीं
झाली कशि बाई ! छाती–
चढण्या या बुरुजावरती–
सोडुनी मऊमउ शेज ?

येतसे गडावर धाड
आलेच नजिक आडदांड !
कोण त्यांत तरणाबांड ?—
झळकतो शिरावर ताज !

का वटारतां मज डोळे ?
मुरकतां वाजवुन वाळे
कळले हो ! सारे चाळे
इकडीलचना महाराज ?"

जोधपूर, २७।७।२३.

# सौंदर्यासक्ति

[सुनीत]

विश्वाचा अधिभूत तो बहुविधा निर्मी मनोज्ञाकृति
वाटे, 'जन्मच हा निरंतर सुखें जावा तयांच्या रतीं'
ज्या त्यांच्यांत विशेष रम्य असती बाह्यांतरीं तत्वतां
प्राशाव्या नयनीं, मनास गमतें, त्या पाहतां पाहतां

नेत्रांना नच वाणि येइल कशी ती रम्यता वर्णितां ?
वाणीला नच नेत्र येइल कशी ती दिव्यता देखितां ?
जो ज्योतिर्मय राहतो रसरसा त्यांच्यांत आलोक तो–
आत्मारामच जाणतो सकल हा कीं राम तो जाणतो !

सेवा ती सुषमा किती परि न हो दिव्यत्व कांहीं रितें
जों जों प्राशन ती करा उलट तें तों तों तसें वाढतें
इच्छा ही अनिवार वाढत पुढें जाते तशी सारखी
त्यायोगें लवमात्र चंचल मना लाभे न वृत्ती सुखी !

त्यालागीं जडतें पिसेंच, दिसते रम्याकृती जेधवां
आनंदें हृदयोर्मिका उसळती ती ध्यावया तेधवां

जोधपूर, २।१०।२३.

---

# न्यायासनासमोर—

[ पांडव–गज्जल ]

वादिच्या सांगून झाल्या जों न तक्रारी पुऱ्या
तोंच चालूं लागल्या त्या भोंवयांच्या कातऱ्या

हालवीला ओठ थोडा जों पुढें बोलावया
ऊर छेदूं लागल्या तों तीक्ष्ण नेत्रांच्या सुऱ्या

तीक्ष्णता वाढे अशा या दोहिंच्या संमीलनें
वांचणें त्यांतून कैशा चित्तवृत्ती धावऱ्या ?

तीक्ष्णतेच्या या दुहेरी फासतां पेंचामधें
वादिच्या झाल्या विचारी चित्तवृत्ती घाबऱ्या

जाहला बेहोष प्रेमें हावभावें सूचवी,—
'मान कीं ना मान, माझ्या फोल तक्रारी खऱ्या !—

चालुं दे वेगें त्वरेनें त्या सुऱ्या त्या कातऱ्या
प्रेमरंगीं रंगल्याला वाटती त्याची बऱ्या.'

जोधपूर, ९।१०।२३

# उत्कट प्रेम

[ मधुवाहिनी—गज्जल ]

हृद जाहलें शतदा द्विधा विनवोनिया तुज सुंदरी !
असु पातले अधरीं तरी कशि संभवे न दया उरीं ?

तव वेड ना मन गे ! जरी मम उंबराहि चढावया—
तरि तो नको चढुं, जात जा क्षण देवडीवरुनी परी !

मजला नको बघुं, जा तशी, सदनाकडेहि नको बघूं,
बघु दे पुरेपणिं एकदा तव आकृती परि साजरी

कुशलें नको मम तूं पुसूं जरि इच्छिसी न पुसावया
कळवीत जा परि आपुलीं कुशलें मला निशिवासरीं !

जलदेवता सखि ! तूं जणूं तुजसाठिं चातक मी भुका
मज तोषवी वरसोनिया प्रणयें सरींवरती सरी !

मोर्शी, १५।६।२४

ग्रंथ संग्रहालय ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ता.
ठाणे.

# शापाकुल देवता

[सुनीत]

डोळे निश्चल लागती तव पदीं (तूंतें कळावें कसें ?)
जासी तूं पुढती अये भगवती ! मागून मी येतसें

मागें फेक कृपाकटाक्ष वळुनी दीनावरी एकदां
देवी ! ना तर यापरी पतित हा राहीलना सर्वदा !

नीचाची कवणा असेल असली दृष्टी महा पापिणी—
जी किंचित् वरती धजेल करण्या त्वद्दर्शनीं पापणी ?

जागे आदरभावना, न कळतां, चित्तांत त्वद्दर्शनें
वाटे, त्वत्पदधूलिकेंत समुदें घ्यावींत लोटांगणें;

सोमाहून सुरम्य शीलसुषमा शोभे यदीयाननीं,
पुष्पें कोमल लाजतील मृदुता ऐसी वसे यन्मनीं—

लोकोद्धार करावया खचित त्या तुम्ही सती योषिता—
होता या अवतीर्ण मर्त्य जगतीं शापाकुला देवता !

कल्याणार्थ जगाचिया झिजवितां काया तुम्ही लीलया
नाहीं मानव किंतु देव तुमच्या ध्याती कुशीं यावया !

नागपूर, २४।८।२५.

---

# उषा आणि संध्या

[ सुनीत ]

लेई अंशुक लाल ही भरजरी, काषाय ती धूसर
ही सौभाग्यरमा खुले रुचिर, ती संन्यासिनी मंदर

ही स्वीयागमनीं जगास उठवी, ती त्याजला झोपवी
ही लोकांत अशांतता पसरवी, ती शांतता वाढवी

दोघीही असती सुरेख जणुं कीं कल्पद्रुमाच्या कळ्या !
मुग्धा, चित्तहरा जुळ्याच बहिणी कीं आवळ्या जावळ्या !

उल्हासी परि एक आणि दुसरी भासे उदासीनशी
याचें कारण एक मात्र गमतें या माझिया बुद्धिशीं,–

'येई नाथ म्हणून ही खुदखुदे बाला उषा हर्षिता !
जाई नाथ म्हणून ती हळहळे संध्या सती दुःखिता !'

नागपूर, ४।१०।२५

# स्वप्न

[ सुनीत ]

तूं बाहू पसरून घट्ट धरितां पोटीं मला ओढुनी
माये मीं पहुडें क्षणैक शिर हें अंकीं तुझ्या ठेउनी
मातें त्या अचलासनावरुनिया ओढोनिया खालती
आई ! कोण बरें करील नसत्या पापापराधाप्रती ?

मातें हुंगुनि चुंबुनी निजवितां तूं त्या त्वदंकावरी
स्वप्नाच्या मधु सृष्टितून विहरे मच्चित्त वेड्यापरी
सोनेरी पर हालवीत सहसा तों मंद वायूवरी—
येती हासत देवदूत, मजला पाचारिती ते करीं,—

" ये-ये-ये चल रम्य नंदनवनीं आम्हांसवें नंदना !
अर्पू सुंदर याहुनी तुज तिथें सौवर्णसिंहासना "
मातें आग्रहती पुनःपुन किती सप्रेम ते या वचीं
वारंवार कथीं तयास तरि मी, " मातें न त्याची रुची "

ते पंखांवरुनी बळेंच मजला नेऊं तदा लागती
त्वन्नेत्रांतुन आसवें वरसतां तों, ये मला जागृति.

नागपूर, ९।३।२६

# नृपतिनंदिनी

[ भक्तजन सदा ] •

नृपतिनंदिनी ! येसि कुठें या विपिनीं ?

स्वर्गोपम परम रम्य
रत्नहेमखचित हर्म्य,
पुष्पोपवन येसी सोडुन
व्यर्थ कां वनीं ?

माजे हें गहन विजन
आंत न ये एक किरण
जासी यांतुन ज्योत्स्ना ओतुन
सहजशोभिनी !

वसति यांत अदय जीव
भीति तयांची सदैव
येथें रमति वन्या युवति
अयि ! विलासिनी !

कुसुमाहुन मृदुल काय
दिधला भूवरि न पाय
कांटे कठिण पायीं घालुन
फिरसि कामिनी !

पसरे उत्तुंग तुंग
त्यावर तें बिकट शृंग
वेगें चढण जासी चढुन
धैर्यशालिनी !

वरतीं तूं चंद्रकोर
खालीं हा मी चकोर
डोळे लावुन पाहीं मोहुन
मनविमोहिनी !

स्वाभाविक रुचिर सांज
खुलुन दिसे अधिक आज
वायू वाहुन नेई वाहुन
तव छबी जनीं.

पांचगणी, ५।६।२६

## कसें होईल ? [ शा. वि. ]

जातांना पथिं तोंडओळख जरा
झाली तुझ्याशीं कुठें

तों तूं रोखियलें बळें भिवइचें
माझ्यावरी कामठें !

आतांपासुन येवढी जर तुझी
झाली तयारी गडे !

झाली ओळख दाटशी तर कसें
होईल माझें पुढें ?

मोर्शी, २०।७।२६



२

# गोफण मारणारास—

[ भिल्लीण-गज्जल ]

–रे ! थांब नको गोफण ती उंच उगारूं
त्या दीन विहंगास नको नाहक मारूं

या निर्मल वातावरणीं, रम्य सकाळीं
स्वच्छंद चहूंबाजुंस दे त्यास भरारूं

कापीत अनंतांतिल हा शीतल वारा
तत्किन्नरकंठांतुन दे गीत थरारूं

कोठेंतरि रानांत दडे सोबत त्याची
यायास पुन्हा सन्निध ती दे ललकारूं

बैसून जरा वल्लरिच्या कोमल दोलीं—
आंदोलत, दे मुक्तरवें तीस पुकारूं

पोटांत नसे काल निशेपासुन कांहीं
भक्ष्यार्थ फिरे तो, पथ दे त्यास सुधारूं

तान्हीं असती कोटरिं सोत्कंठ भुकेलीं
त्यांना तृण, दाणे, जल दे नेउन चारूं

तीं नीडिं बुभुक्षातुर, अज्ञात वनीं ती
हें मागिल चिंताभय दे त्यास निवारूं

खातो तरि तो जीव मुका काय कुणाचें ?
घे! आवरता हात ! नको त्यास हकारूं

निर्वाह करी कंदमुळें, वारिवरी तो
दे वाहुं! सुखेनैव तयाचें भवतारूं

तूं सूज्ञ, दयाळू असती मानवयोनी
दे नीच विचारीं नयनीं तोय तरारूं

—रे ! थांब, नको क्रूरपणा नेउं थराला
मातून नको माणुसकी पार झुगारूं

जो ईश्वर निर्मी तुज तो निर्मि तयाही
त्याचें करुण स्निग्ध नको चित्त विदारूं

नागपूर, १८।८।२६

# एकदां—

लाजेल गुलाबी सांज
गे ! लाज पुरेपणि लाज          एकदां

चिव्‌चिवेल बुल्‌बुल रानीं
गा गोडगोडशीं गाणीं          एकदां

थांबेल पवन हा निमिष
भुरभुरुं दे कुंतलपाश          एकदां

फुलतील कळ्या अवकाळीं
मनमुराद हास कपोलीं          एकदां

कोसळेल तारांगणही
वर डोळे भरुनी पाही          एकदां

क्षण जलवंती थबकेल
गे ! ठुमकत मुरडत चाल          एकदां

मी सदेह ठायिं थिजेन
हें अभिनव दृश्य बघून          एकदां

नागपूर, ६।९।२६

# बुरखेवाली

[ मनमोहन ]

त्या जाळिदार बुरख्यांतुन बघसी कां चोरुन मारून ?

दूरवूनी त्यास वेगें
ये, अशी गे ! सानुरागें
ये जेंवि कलानिधि विरल घनाचें अवगुंठन सारून

यौवनीं तूं येसि नुकती
दिव्य फाके देहकांती
कोवळ्या किसलयाआडिल कलिका काय परी बहरून !

भव्य, पाणीदार नयनें
फेकिती हीं सौम्य किरणें
झिरझिरित धुक्यांतुन अथवा पाही उल्कायुग्म दुरून !

रोमरोमीं काम नाचे
काय वर्णूं त्यास वाचे !
कां खनाळांतुनी रसाळ गंगा जाई व्यर्थ झरून !

घेसि जरि आपाद गोषा
दृश्य होई वेषभूषा
निस्तब्ध तळ्याचें तळ नजरेतें पडतें जेंवि वरून

स्वर्गपटिं तो ईश राही
आणि सारें विश्व मोही
तूं रूपदेवता तेंवि टाकिसी पडद्यांतुन भारून

राहि गे! अदृश्य राही
मात्र कृपया भक्त पाही—
जो पूजी तव अप्रतीम प्रतिमा हृदयावर कोरून

जोधपूर, २७।४।२७

---

# सौंदर्योपासना

[ सुनीत ].

दृष्टी ठेउन नासिकाग्र असतां तो देवताराधनीं
गाभाऱ्यांतुन हांसणें उमटलें अस्पष्ट मंजुस्वनीं;
जिज्ञासातुरलोचनीं सभवतीं त्यानें जरा देखिलें
तों त्याच्यावर वाकड्या भिवइचें तूं कामठें रोखिलें !

होती गुंफित माळ घेउनि फुलें मूर्ती तुझी मोहक
पाहोनी तव रूप होय हृदयीं तो नेत्रसौख्योत्सुक,
अन् तद्दृष्टि चळून मूर्तिवरुनी लागे तुझ्या चिंतनीं
हो त्यालागिं तव प्रसाद, बघतां तूं दृष्टिकोणांतुनी !

सोडोनी मधुमूर्ति रेखिव तुझी ती चालती बोलती—
वेडा कोण बरें स्तवील नुसत्या पाषाणमूर्तिप्रती ?
मानोनी तुज इष्टदैवत यदा स्थापील हृन्मंदिरीं
त्याचें होइल ध्यानधारण पुरें तेव्हांच राजेश्वरी !

माला गुंफुन वाहसी अविचला मूर्तिप्रती व्यर्थ का ?
त्यातें तूं तुज तो सुरोपम, वहा त्याच्या गळां मालिका !

अजमेर, १२।५।२७

# नजरभेट

[ हृदय सांग चोरिलें ]

सहज भेटतां जरा हंसून सुंदरी !—
नजर लाजरी कशास खोचसी उरीं ?

नजर हीच एकवार तापद करि हृदयिं वार
फिरुन रोखिसी कशास तीच आसुरी !

ऊर तदा करुन जाय दक्शार तो खोल जाय
लवण सांडसी कशास व्यर्थ त्यावरी ?

रुतुनी तो शर अमोघ कायमची होय भेग
कुरतडून काढिसी कशास ती करीं ?

गेला तो रम्य काल त्यास गिळी अदय काळ
करिसी मूर्त तो कशास पुनरपी तरी ?

घडलें तें चित्र भंग विटले त्यावरिल रंग
फिरविसी कशास कुंचली तयावरी ?

तोडुनियां मोहपाश येथ वसें मी निराश
उगिच लाविसी कशास आस हावरी ?

मी भणंग जीवन्मृत          पाजवून प्रेमामृत
जखडिसी कशास प्राण कुटिल वागुरीं ?

सम्राज्ञी तूं अमीर          वनवासी मी फकीर
मज कशास चाखविसी प्रणयमाधुरी ?

हृदयाच्या पायघड्या          पायिं घालितों उघड्या
तुडवुनी खुशाल जा नृपालमंदिरीं !

अजमेर, २४।५।२७

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
क्र.
ता.
ठाणे.

# नजरभेट

[ हृदय सांग चोरिलें ]

सहज भेटतां जरा हंसून सुंदरी !—
नजर लाजरी कशास खोचसी उरीं ?

नजर हीच एकवार तापद करि हृदयिं वार
फिरुन रोखिसी कशास तीच आसुरी !

उर तदा करुन जाय दक्शार तो खोल जाय
लवण सांडसी कशास व्यर्थ त्यावरी ?

रुतुनी तो शर अमोघ कायमची होय भेग
कुरतडून काढिसी कशास ती करीं ?

गेला तो रम्य काल त्यास गिळी अदय काळ
करिसी मूर्त तो कशास पुनरपी तरी ?

घडलें तें चित्र भंग विटले त्यावरिल रंग
फिरविसी कशास कुंचली तयावरी ?

तोडुनियां मोहपाश येथ वसें मी निराश
उगिच लाविसी कशास आस हावरी ?

मी भणंग जीवन्मृत पाजवून प्रेमामृत
जखडिसी कशास प्राण कुटिल वागुरीं ?

सम्राज्ञी तूं अमीर वनवासी मी फकीर
मज कशास चाखविसी प्रणयमाधुरी ?

हृदयाच्या पायघड्या पायिं घालितों उघड्या
तुडवुनी खुशाल जा नृपालमंदिरीं !

अजमेर, २४।५।२७

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
ठाणे.

# स्वरूपसुंदरी

[ गीतिका ]

फुलपाखरापरि साजसी अयि रूपयौवनमंजरी !
हिरव्या लतावलयांतुनी फिरतां निनादति मंजिरी

विलसे दुकूल तनूवरी भररेशमी हलकें निळें
कुरळे वरी कच सावळे रुळती अहीसम मोकळे

झर्णि गुंफिसी कर त्यांतुनी श्लथ बांधिसी कबरी बरी—
मुरकावितां लव मान, ती वरखालि हो वरचेवरी

उडुवृंद अंबर शोभवी खडि भूषवी तव ओढणी
नटवेष लावि न हा कुणा तरुणास उत्कट ओढणी ?

पदरांतुनी झळके निकें जरिपोलकें मृदु अंजिरी
रिझवी विमोहनमालिका चमकून ओझरती उरीं

तटिनीतटीं क्षण ठाकसी हरळींतुनी क्षण हिंडसी
क्षण कातळावर बैसुनी चल पाउलें जर्ळि सोडसी

खुडुनी फुलें शिरिं खोविसी मदनध्वजा जणुं रोविसी !
दंव ज्यापरी किरणांतरीं किति त्यापरी गुणिं गोविसी

वदनीं अनंगतरंग कीं सरिता अभंग तरंगती !
नयनीं सुरेशधनूपरी रतिरंग रंजक रंगती

अधरीं अनारकलीपरी झळके छटा धवलारुणी
मिळणार पान करावया कवणास ती मधु वारुणी ?

तव देखतां तनु-कोमती सुकुमारिका नवमल्लिका
तव ऐकतां रव-थांबती कलगायिका वर वल्लिका

तुजला म्हणूं भवयोषिता ! अथवा गणूं कुणि देवता !
वदुं, "धन्य ! धन्य !" मुखेंच वा "जनिते तुझे जननीपिता"

अजमेर, २६।५।२७

# प्रतीक्षा

[ मालकंस ]

न देसी जरी भेट गा ! कासया—
  पिसें लाविलें तूं वृथा मोहुनी ?

कळे पूर्ण आतां मला कीं फसें—
  तुला आपुलें चित्त मी वाहुनी

अगा ! नेत्र गेले शिणोनी पहा
  तुझी वाटुली पाहुनी पाहुनी,

तसे पाय आले भरोनी, असें—
  उभें सारखें राहुनी राहुनी,

सुकोनी घसा खोल गेला तुला—
  विमुक्तस्वरें बाहुनी बाहुनी,

पहा ! जीव त्रासून गेला महा
  अनंतापदा साहुनी साहुनी

नको रे ! नको हें जिणें यापुढें
  झणीं मृत्यु दे तो बरा याहुनी

नागपूर, २१।८।२७

# हृदय मृणालिनि ! इ.

[ सारंग ]

हृदय मृणालिनि ! कधिं न करिं खुलें
अनुतापें मग जळशील खुळे !

विरल धुक्याचें मृदुल धवल चिर
लेवुन येतिल दिशा मनोहर
दंवमुक्तांचा देतिल तुज सर
अर्धपलांतरिं परि तो निखळे

हांसत हांसत येइल भास्कर
आलिंगिल तुज लांबवुनी कर
तूंहि तयाला भुलशिल सत्वर
माखिल परि तो अंतीं चिखलें

मधु स्वरांची फिरवित भिंगरि
झापा टाकित येइल भ्रमरी
कथील कानीं गूज परोपरि
त्यागिल परि ती डंखून बळें

असाच कुणि जन खुडुनी नेइल
विभुला अथवा सखिला वाहिल
सुकुनी जातां फेकुन देइल
भरली अवघी जगतीच खळें !

नागपूर, ३०।८।२७

# लेंढ्रा रस्त्यावरील सायंकाळ [ शा. वि. ]

आतां संथ दिव्यापरी मिणमिणे भूपृष्ठ दृष्टीपुढें
होती अंधुक दूरदूरवरलीं संकीर्ण झाडेंझुडें

जाई अंबर काळवंडत, दिशा काळोखती भोंवतीं
अंधारांत विलीन होइ अवघें ब्रह्मांड गोलाकृति

राहाटीहुन गांवढ्याप्रत गुरें केव्हांच माघारती
पक्षीही घरट्याकडे परतती, कोणी न हिंडे पथीं

कांहीं हाटकरी निशेमधिं परी मागेंच रेंगाळती
शृंगारीक पदांमधील कडवीं तारस्वरें घोळती

रानीं रातकिडे सुरावर खड्या गोंगाटुनी किर्रती
देती दर्दुर दल्दलींतुन तयां ड्राँ ड्राँ रवें हुंकृति

पाकोळ्या मनसोक्त घोळ घिरट्या खालींवरी घालिती
होती डोळस वागुळें फडफडा उंचावया लागती

औदास्यान्वित शांतिचें अवतरे साम्राज्य चोहींकडे
दृष्टीतें तिमिराविणें न दुसरें कांहींहि कोठें पडे

पाचोळ्यांत कुठें मधून मधुनी खेळे परंतू हवा
एखादा दुसरा असाच चमके सांदीमधें काजवा

खेडींपाडिं सभोंवतालिं दडती जीं गर्द झाडींतुनी–
काळोखी उजळीत त्यांतिल जवें होई दिवेलावणी

मार्गीं मंद दिवे समांतर उभे स्थानीकसंस्था करी
होई गोचर वीथि धूळकटली त्यांच्यामुळें पांढरी

ठाके बाजुस वावरांत पडक्या देवालयीं मारुती
त्यातें भाउक धूप होमुन सुखें ओवाळती आरती

जोरानें घिड धांग धांग दणके गर्जोनिया चौघडा
घंटा जोडिस सारखी घणघणे, गर्दी करी ओरडा

तो वातावरणांत पार वितळे जाऊन कोलाहल
मागोनी पडसाद मात्र उठती कापीत झंझानिल

येती लाजत भीत भीत गगनीं लक्षावधी चांदण्या
मीही टाकित पाउलें झपझपा येईं तुला भेटण्या.

नागपूर, २१।१०।२७

# प्रबोधन

[ नराचिका—गज्जल ]

उठून एकदां तरी गडे ! जरा पहा वरें
दिशांदिशांतुनी कसें यथावकाश झांजरे

खुले निळ्या नभोऽगणीं    सतेज शुक्रचांदणी
सुरम्य संधिकालिं या दिसे समस्त साजिरें

जमे अधांतरीं मुन्हें    चिकाळ दाट पांढरें
तयांतुनी दवांबुचा विशुद्ध स्रोत पाझरे

पुन्हां पुन्हां मघापुनी    समित्र कुक्कुटाग्रणी
विराम घेत आरवे उदग्र कर्कश स्वरें

सुरालयीं पलीकडे    सताल चौघडा झडे
सुरेल नाद वेणुचा कणांकणांतुनी शिरे

निनादणें जसेंजसें    भरास ऐन येतसे
हळूहळू तसेंतसें नभास येइ जागरें

करून काकडारती    महंत मंत्र गर्जती
पलांत वायुमंडलीं पवित्र घोष तो विरे

रचून संघ संगतीं    नभांत मंडलाकृती
मजेमधें भरारती करीत शब्द पाखरें

चरावयास शाद्वलीं निघे चतुष्पदावली
विगूढ घुंगरुध्वनी पथीं समोंवतीं भरे

धरून नाचऱ्या करीं अभीर गोड पावरी
तियेस संथ वाजवी स्वकीय कंपिताधरें

शिरीं दुधाणि घेउनी पुरीस येति गौळिणी
सलील मंद नादती तदंघ्रि मंजु नूपुरें

प्रभातवात संचरे विनम्र रान त्या भरें,
फुलाफुलावरूनिया प्रसन्न चंचरी फिरे

उदे हिरण्यगर्भ हा प्रकाशती दिशा दहा
करूं तयास ऊठ गे ! नत प्रणाम आदरें

नागपूर, २०।१।२८

---

# नदी आणि पाषाण

[ दिंडी ]

कुण्या सरितापात्रांत खोल जागीं
ध्यान लावी पाषाण महायोगी
युगामागें लोटती युगें कैक
तो न हाले तरि बोटभरी एक

त्यास ज्येष्ठाचा तापवी उन्हाळा
श्रावणाचा करि चिंब पावसाळा
मार्गशीर्षाचा कांपवी हिवाळा
तरी पुरुनी तो उरे तिन्ही काळा

रुते त्याचा पंकांत तपोदेह
घरे पडुनी हो कीटनिवासार्ह
चढे वरती शैवाल, दाट कोण !
जाय शोभुन तें वल्कलासमान

कानिं त्याच्या लागून अहोरात्र
गाइ सरिता रसपूर्ण प्रेममंत्र
परी त्याची अरसज्ञता बघून
जाय आवर्षाणि दूर ती निघून

तदा बोले पाषाण तिला कष्टी,
"परत ये, गे! बघ क्षीण देहयष्टी
व्यर्थ सोडुन मज जासि का पळून ?
अणूअणु मी जातसें विरघळून"

नागपूर, ३०।३।२८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्थळ प्रत
ग्रं. नं.
ता.

# प्रणयवंचितेची इच्छा

[ गीति ]

“ओसाड आडरानीं राहो माझें भिकारडें थडगें
येऊं नको तिथें तूं टेकाया आपुले कधीं गुडघे

चोहींकडून त्यातें टाको झांकून एकजात तृण
सांधूं नको परी तूं स्फटिकाचे फेनशुभ्र पाषाण

ढाळो लता फुलें वा सोडो निश्वास अंजनीरमण
येऊं नको नको तूं नक्राश्रू व्यर्थ सिंचण्यास पण

गावो विहंगमाला वैलापिक गायनें अहोरात्र
काढूं नको नको तव श्रुतिकर्कश रव परंतु तूं मात्र

गाण्यांत सूर मिसळो झुळझुळुनी अंतरावरून झरा
छेडूं नको श्रमें तूं घटकाभरही परंतु तंबोरा

लावो निशा उडूंचे तेजस्वी दीप शेंकडोगणती
जाळूं नको तुझी तूं खापरपणती परंतु मिणमिणती

निद्रा मला न लागे गाद्यागिर्द्यांवरी कधीं शांत
यास्तव सुखें निजूं दे भूच्या उदरांत कल्पपर्यंत”

नागपूर, ४।११।२८

# मातेच्या निकटीं— [ सुनीत ]

एकाएकिं कधीं कधीं मम मनीं उद्विग्नता येउनी
आई गे ! मज जीव हा पळभरी जातो 'नको' होउनी
तेव्हां ढाळित आसवें तुजकडे मी धांव घेतों त्वरें
माझें हृद्गतदुःख मी तुजविणें सांगूं कुणाला बरें ?

डोकें पोटकुळींत घालुन तुझ्या नावेक मी झोंपतों
जातो चिंब भिजून पालव तुझा अश्रुप्रवाहांत तों !
माझ्या कोळपल्या जिवास मिळतो तेथें विसावा खरा
पांथस्थाप्रत लाभतो तरुतळीं जेंवी निवारा जरा

शब्दांनीं नुसत्या कधीं न शमतें चित्तांतलें झोंबणें
जे होते समभाव त्यासह दुजे ते कोण आईविणें ?
स्वापत्यास भवोदधींत जननी तारावया सांगड
वत्साची जगतीं कुणास असते धेनूविना आवड ?

होवो तीव्र कपाळशूल भडको चित्तांतला दाह वा
मातेच्या निकटीं समस्त निवुनी उत्साह येतो नवा.

गानपूर, ९।११।२८

---

## पुष्पकेतन

[ भक्तजन सदा ]

पुष्पकेतना ! आवर शर आवरना !

तूं शरसंधानकुशल
अजित वीरबाहु अतुल
तुझें हृदय मोठें अदय
द्रव तयास ना

कोमल तव कुसुमचाप
परि दुस्सह वितरि ताप
फेकी विशिख विंधी अचुक
युवतियुवजनां

त्यासह तूं सज्ज सदा
घेसि न विश्राम कदा
नादीं या रत होसी संतत
देसि यातना

असती शर तीक्ष्ण फार
करिती ऊर आरपार
मर्मी रुतुन जाती मथुन—
प्रणयभावना

कुसुमाकर, रजनिनाथ
प्रिय अभिन्नहृदय साथ
स्नेहें घेउन नेता होउन
करिसि क्रीडना

कृष्णच तूं कृष्णतनुज
नीति, नय न कांहिंहि तुज
अर्पी म्हणून गौरीरमण
तुज हुताशना

तेव्हांपुन तूं अनंग
करिसि तरी रंग ढंग
नाना नूतन चाळे करुन
रिझविसी मना

नागपूर, ११।४।२९

---

## तापीपूर्णासंगमावर– [ सुनीत ]

ये तापी तिकडून ती, इकडुनी ये ही पयोष्णी अशी
एकीमेकिंस धावुनी बिलगती दोघीजणी आतुरा;
सप्तशृंगनगात्मजा उभय या—या प्रेमळा सोदरा !
अन्योन्यांस सहर्ष कीं कवळती या जन्मदा, मावशी !

यांचा संगम हा हृदंगम महा देखून दोन्ही तटीं–
आश्चर्यें जिथल्या तिथेंच खिळुनी झाडें उभीं राहती !
होती स्तंभित आणि दूरदुरुनी त्यांच्यांतुनी पाहती–
माना उंचवुनी बकासम जुनीं देवालयें गोमटीं !

दोघी एकवटून, घेत गिरक्या, मोदें उड्या मारित
अभ्राच्छादित भोंवताल भरती गंभीर पाथोरवें !
वल्हीं घेउन लांब लांब, मरुनी यात्रेकरू नाखवे–
नावा नावलती जवें गढुळल्या ओघांतुनी सस्मित !

मातें आणिसि तूं बरोबर, तुझ्या मातामहाच्या गृहीं
देखें मी म्हणुनी अभिन्नहृदया ! शोभा महोदात्त ही

नागपूर, २२।४।२९

## निद्रित कलिका

[ सुरेख संगम किती ]

मधु स्वप्नसुखीं दंगली
कळी ही, इतुक्यांतच पेंगली !

पसरली न अजुनी निशा
नच कलंकल्या वा दिशा
तों निजली कीं चांगली !

कुणि अगोचरा यक्षिणी
अलगेच इच्या लोचनीं
फिरवी कीं स्वकरांगुली !

प्रत्युषीं जणूं झोकुनी
दंवबिंदूंची वारुणी
कैफांत अतां झिंगली !

गोंगाट करुन कलकला
किति त्रास खगांनीं दिला
तरि तंद्रा नच भंगली

उपवरा कुमारीपरी
उत्कंठुन अभ्यंतरीं
नव नवलीं कीं रंगली !

आलापित संगीतकें
घे अनिल सारखे मुके
त्या प्रणयरसीं गुंगली

नागपूर, १८।४।२९

# सौ. ताईचा राजा

[ दोहा ]

ताई ! राजा हा तुझा गोजिरवाणा छान
कसा मोगऱ्यासारखा गोरा गोरा पान !

शीर्षी जावळ भुर्भुरे काळें काळें भोर
श्रावणांतले डंवरले नीरद काय समोर !

रुंद उतरतें निटिल हें नितळ आणि अरुवार
अष्टमिचा शशि हा न का अर्धवर्तुलाकार ?

तुरळक हरळीसारखी भिवयांची महिराप
कशी विरिंचिस साधली बघ ! ही आपोआप

टपोर डोळे — आंतल्या पुतळ्या पाणीदार
बालरविकरीं चमचमे किंवा दंवसंभार !

सरल नेटकी नासिका रंध्रें बारिक सान
चांफेकळीकेवांछुनी उचित न उपमा आन !

डुलती डुलु डलु लोंबती कानीं हिरवे डूल
कीं झुळुकीनें हालती निंबोण्या अमढूल !

गौर गुलाबी गाल — छे ! रुचकर मधु गुलकंद,
कोण न मनमानेल तों सेविल हा सानंद ?

आलापित संगीतकें
घे अनिल सारखे मुके
त्या प्रणयरसीं गुंगली

नागपूर, १८।४।२९

# सौ. ताईचा राजा

[ दोहा ]

ताई ! राजा हा तुझा गोजिरवाणा छान
कसा मोगऱ्यासारखा गोरा गोरा पान !

शीर्षीं जावळ भुर्भुरे काळें काळें भोर
श्रावणांतले डंवरले नीरद काय समोर !

रुंद उतरतें निटिल हें नितळ आणि अरुवार
अष्टमिचा शशि हा न का अर्धवर्तुळाकार ?

तुरळक हरळीसारखी भिवयांची महिराप
कशी विरिंचिस साधली बघ ! ही आपोआप

टपोर डोळे — आंतल्या पुतळ्या पाणीदार
बालरविकरीं चमचमे किंवा दंवसंभार !

सरल नेटकी नासिका रंध्रें बारिक सान
चंपककलिकेवांचुनी उचित न उपमा आन !

डुलती डुलु डलु लोंबती कानीं हिरवे डूल
कीं झुलुकीनें हालती निंबोण्या अमद्रूल !

गौर गुलाबी गाल — छे ! रुचकर मधु गुलकंद,
कोण न मनमानेल तों सेविल हा सानंद ?

हंसती ओठ न — विकसतें अनार हें अळुमाळ !
दाणे आंतिल यावया अजुन असे बहुकाळ

पातळ हनु ही आतळूं करीं अशी किति वेळ ?
नसे शिंपलीशीं इचा काय हुबेहुब मेळ ?

गळ्यांतुनी उतरे उरीं बजरबट्टूंची माळ
गुणीं गोविल्या या कुणी खिरण्या पीत रसाल ?

पंजांच्या वळुनी मुठी मनिं गुंजे स्वच्छंद
हृदयें ठेवी आपुलीं त्यांत सदोदित बंद

गोंजारूं अन् करूं किती याचें कौतुककोड ?
तुझ्या ममत्वाशीं कशी करूं तरी मी जोड ?

असो. अतां हे एकदां थोपटुनी मृदु दंड
— आर्जवितों देवास कीं, "या दे आयु उदंड."

नागपूर, ९।५।२९

# कृतज्ञतेचे अश्रु

[ सुनीत ]

जेव्हां चोहिंकडून व्योम अवघें माझ्यावरी फाटलें
'जाते काय धरा दुभंगुन' असें मातें भयें वाटलें
झालें मस्तक सुन्न अन् चमकले डोळ्यांपुढें काजवे
द्याया तूंच धृती उदारहृदया ! आलास तेव्हां जवें

विद्यावंत सुशील नागरिक मी व्हावें म्हणोनी मला—
देसी शिक्षण संप्रती; ऋण तुझें फेडूं कसें ? प्रेमला !
औदार्यें तव प्राप्त होय मजला 'बी० ए०' उपाधी, परी—
गंभीरा तव वृत्ति अस्थिर करी ही कैकदां वैखरी !

व्हावे हातुन दोष या, — न दुसरें दुर्भाग्य यावेगळें
खाई आंतुन सारखें मन मला चोंचून हें त्यामुळें !
घेसी सावरुनी परंतु, — अससी सन्मान्य तूं जाणता
मातें कांहिं कळे न, मात्र इतुकें मी जाणतों नेणता,—

'अश्रूंनीं अगदीं तुडुंब भरलीं हीं लोचनें लावितों
पश्चात्तापपुनीत आणि शिर हें पायीं तुझ्या ठेवितों'

नागपूर, २६।८।२९

---

# धीवरकन्या

[ अर्धतनू वारुळीं ]

काळ्या ठिक्कर त्या खडकावर निर्भय राहुन उभी
पाहसी क्षणोक्षणीं का नभीं ?

लागोनी कळ हातांतिल गळ निसटुन खालीं पडे
बुडबुडू उठती तों बुडबुडे

काळे काळे श्रावणांतले अंबुद तरती वरी
गलबतें हीं खालीं सागरीं

घोंघावें वारें, झाकोळें भोंवतीं
चमकोनी चमकन दांत विजा दाविती
डहुळोनी पाणी तरंग हेलावती

शीकर त्यांचे कारंजोनी खळखळ फेसाळती
आणि तव पाद प्रक्षाळती

हिरेमाणिकें हीं वरुण सुखें उधळि त्वदंघ्रीवरी
रिता तो रत्नाकर कीं करी !

झिमझिम वरुनी शचीश पाणी रिपरिपवी त्वच्छिरीं
धार जणुं अभिषेकाची धरी !

तूं मीनाक्षी कशास धरिसी मीन दीन बापुडे ?
अन्य कुणि जालिं न का सांपडे ?

केवर्तकुमारी सत्यवती तूं जणूं !
पर्जन्यजलानें चिंब भिजे त्वत्तनू
लाभे ना तुजला काय कुणी शंतनू—

प्रेमभरानें जो तुजला ने आलिंगोनी उरीं
आपुल्या भव्य राजमंदिरीं ?

तसा असे वा कुणी तव युवा जो तुजसंगें रमे
तुजपुढें शब्दोशब्दीं नमे

उठतां वादळ जो चोखंदळ धीर देउनी तुला
हकारी मचवा कापित जला

गीत गुंजवी तुला रंजवी जो तुज दे आंसवें
—काय तें अमोल मोतीं नवें ?

गंभीर कधींकधिं जो या अब्धीपरी
आणि जो यापरी कधीं रुद्रता धरी
जो हांसे खिदळे सदा यापरी परी

शीळ वाजवी जो बोलावी दिसतां तूं एकली
कुठें तो ?—गालिं पडे कां खळी ?

नागपूर, ६।९।२९

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्र. ........ नं. ........ ता. ........
ठाणे

# गडे ! लाजना

[ वेषाचें सार्थक किति ]

लाज लाज लाज गडे ! लाज एकदां
एकदांच आणि नको मग पुन्हां कदा

— लाजतांच, होइल संकोचिता उषा
ओशाळ्या होतिल या तत्क्षणीं दिशा
गोरेमोरे गुलाब मग सदाकदा !

मिरवतील काय बडेजाव तारका !
कुंदाचा नौंकझोंक सर्वथा फिका !
उधळतील अप्सरसा हास्यसंपदा !

लाजेची झिरपतांच गालिं पाझरी
विटुनी जाईल पार द्राक्षमाधुरी
निःसंशय नीरसेल रसमयी सुधा

सेवाया ती यथेच्छ जीव आतुरे
स्फुरती हे फिरुनफिरुन ओठ कांपरे
रसिक तिच्या प्राप्तीस्तव कोण ना फिदा ?

सौख्यप्रद आणि मधुर ती तिची रुची
उघडोनी ह्रदय कथूं कोणत्या वचीं ?
वर्णाया ती यथार्थ मूक शारदा !

लाजाळू खचित फार फार लाजरी
लज्जेची मूर्तिमती पुतळि साजिरी
ती निज गुण विस्मरेल, — लाजशिल यदा

नागपूर, १७।९।२९

---



४

# विधवेचें आत्मसमर्पण

[ शिखरिणी ]

"—मदंगातें आतां मलयपवना ! स्पर्श न करीं
असा त्वन्माल्यांचा परिमल वसंता ! न विखरीं
त्वरें त्यानें जागा मनसिज वृथा होइल उरीं
जसें लेणें तैसें मम हृदय कोरील नखरीं

तिथें नाना चित्रें मम गतसुखांचीं उमटतां
अशी अश्रूंची ही अविरत उमाळेल सरिता
विनोदा ! जा आतां मजजवळुनी दूर निघुनी
विषादा ! ये माझा सुहृद अससी तूंच निधनीं

तुझी आशा आशे ! धरुनि जगतीं जीव जगती
निराशेनें माझे असु परि अजूनीहि तगती
कधींची चालें मी अति बिकट आयुष्यपथ हा
विरामाची जागा तरि न अजुनी ये निकट हा !

कशाला आकाशा ! मजवरि वृथा छत्र धरिसी ?
अगे भूमाते ! कां मज कटिवरूनी मिरविसी ?
तुझीं तेजें हीं कां मज वितरिसी चंडकिरणा ?
कशाला वारीचें मज करविसी पान वरुणा ?

अगा धात्या ! जात्या करुण असती तूं—परिसत्यें,
दुरी राहो सारें ! हृदयहि नसे तूज नुसतें !
खरी अंतीं मृत्यो ! मदत करिसी तूंच सखया
झणीं घे त्वत्पाशीं तुजविण करी कोणि न दया"

नागपूर, ३०।९।२९

ग्रं. क्र.

# अपांगदर्शन

[ पांडव–गज्जल ]

दृष्टिकोणांतून कां तूं पाहिलें माझ्याकडे ?
काळजाला भोसकोनी तीर गेलाना गडे !

हांससी ? आहे तरी कां कल्पना कांहीं तुला ?
वेदना होऊन केवी जाकळें तें बापुडें !

दाबिसी बुद्ध्या कशाला हांसणें ओंठांवरी
घे ! पुरें हांसूनि घे ! कां पाहसी मागेंपुढें ?

'वेड लावावें पराला, मौज मारावी स्वतां
पंजरीं रावा धरावा स्वैर व्योमीं जो उडे'–

ही कला ठावी तुम्हांला जन्मजन्मापासुनी
चोरुनी ठेवा, परंतू ती अशानें ना दडे;

जीव जातो बावरोनी ! कुंठिता होते मती !!
ठेपतें येऊन जेव्हां या तऱ्हेचें सांकडें !

नागपूर, १।१०।२९

# मनीषा

[ भिल्लीण–गज्जल ]

प्रासाद नको ! फार बरा जीर्ण तणारा !
आवार कशाला ?–भंवतीं झाडझडोरा !

दारास सुशोभीत कराया मृदु शाखा,
नामी मखरें वल्लरिचीं आणि फुलोरा

आल्यास बसाया चटई तालदलांची,
प्याया जल, स्वादिष्ट फलाली उपहारा

बाजूस मनोवेधक संगीत झऱ्याचें,
झाडींत खगांचा भरला गोड घुमारा

पाटाव पटाचा नव पोशाक कशाला ?–
जाडी भरडी खादिच झाकील शरीरा !

तेजाळ तडिद्दीप नको शांत निशीथीं !
पाडील उजाळा समई मंद गभीरा !

गादी नलगे !– भू बरवी ! लोड कशाला ?–
त्याजागिं उशाला भुज होईल सहारा !

थंडींत कशाला पशमी शाल दुशाला ?—
त्याहून बरी वाकळ देईल उबारा !

सांगात खरी ग्रंथ जुने संत जनांचे
त्यांच्या पठनीं जन्म मुदें जाइल सारा !

नागपूर, २४।१०।२९

---

# दिवंगता जननीस—

[ सुनीत ]

माझें शिक्षण निर्विकल्प अगदीं व्हावें म्हणोनीचना—
आई गे ? झिजलीस आमरण तूं सत्कारुनी यातना ?
व्हावें सौख्य मला प्रयत्न म्हणुनी केलेस तूं नेहमीं
दुर्दैवी परि लेशही न शकलों फेडूं तुझे पांग मी !

गेला सोडुन शैशवांतच पिता ! होतीस मागें परी—
तूं आधार अभेद्य, — तीहि निघुनी जासी कशी सत्वरीं ?
जातां होरपळून जीव हळवा विश्राम आतां कुठें ?
अन् आश्वासिल कोण चोहिंकडुनी नैराश्य जेव्हां उठे ?

बोलूं मी मन मोकळें करुनिया कोणासवें यापुढें !
कोणाला विनवूं विनम्र वचनीं वारावया सांकडें ?
मुद्रा केविलवाणि देखुन कुणा येईल माझी दया ?
मायें आणि पुसेल कोण भिजल्या आरक्त नेत्रद्वया ?

मायाळू जरि गे ! असंख्य भंवतीं हे सोयरेधायरे
तूझ्या वत्सलतेबरोबर कसें तत्प्रेम तोलूं बरें ?

अजमेर, २०।५।३०

---

# लवतेया लव लव ईज

[ न्यारिचा वकुत ]

"डोंगराआड लइ तेज      लवतेया लव लव ईज !
ह्यो आलं सम्दं अभार      किति बापा ! कारं कारं
मादला गुडुप अंधार      अक्षीच थामलं वारं

म्होरं न दिसं कायबी
ह्यीं मुकाट झारं उभीं
मज ह्यांचं लागून भी–

थरकांप करत काळीज      लवतेया लव लव ईज !
गडगडतं भरदल्यावानी      मुसळधार पडतं पानी
नाय् संगं सोबुत कोनी      येकलीच पडलीं रानीं
त्ये फिरतां खेतिवरून      खान्याचं रांधिल कोन ?

पोंचनं कदीं मी घरां
भेटेनश्यान लेकुरा
हाय् तुलाच परमेसरा !–

गरिबाची माझी लाज      लवतेया लव लव ईज !"

अजमेर, ८।६।३०

## तुझे कर्णपूर

[ मशीं बोलुं नको ]

तव कानीं देती शोभा कनकाचे कर्णपूर

कांतीमय त्यांचें पाणी
उसळे तव नयनीं, वदनीं
ज्योत्स्नेची फुटुनी तटिनी ओसंडे काय पूर !

आकार हुबेहुब त्यांचा
मकरासम साधे साचा
मकरध्वज कायावाचामनसा कीं त्यांत चूर !

फिरुफिरुनी हलती, डुलती
उडुमिथुनोपम लुकलुकती
भूवरल्या स्वर्गावरती उडती वा दिव्य हूर !

कचकलाप काळा काळा
जणुं उतरे अंबुदमाला !
चमकती चंचला चपला उकलोनी कीं तदूर !

अंधार जेधवां माजे
तो उजाळती निज तेजें
रत्नांचा राजा लाजें ओशाळे कोहिनूर

अजमेर, ३।७।३०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ठाणे

# वाक्प्रहार

[ दिंडी ]

सहज लीलेनें झाडला तमंचा
   ऊर झाला बंबाळ सावजाचा

विकल झाला तो जीव जायबंद
   मनीं झाला संतुष्ट परी व्याध

तूंहि बोलुन गेलास शब्द चार
   हृदय गेले ते करुन आरपार

जाहलों मी निःशब्द दीनवाणा
   तुला बघुनी तें तोष जाहलाना ?

नागपूर, १४।११।३०

---

# पाळत

[ अर्धतनू वारुळीं ]

हालचालिवर माझ्या बारिक देखरेख राखिसी
कोणता वहिम तुझ्या मानसीं ?

होय चूर कामांत मी, मला भान न कांहीं उरे
रोखिसी चोरनजर कां बरें ?

जाय दूर बाहेर मी तई गैरहजेरिंत फुका —
खोदुनी करिसी पूसपास कां ?

दिनरात अशी तव पाळत माझ्यावर—
पाहोनी, माझें काळिज हो कातर
भलभलतें उठतें माथ्यामधिं काहुर

काय होय जाणुनी नेणुनी चूकभूल, ना कळे !
आंतल्याआंतच मी तळमळें

नागपूर, २५।१२।३०

# चित्रलेखा

[ अजि अङ्कुर हा ]

चल, उचल तुझीं अचल लोचन वरता
तत्प्रभा फाकुं दे पुरती

कर मजवरतीं केंद्रित अवघीं किरणें
मम चित्र काढ मग — करो !

उमटेल पहा ! छबी हुबेहुब अगदीं
का मीच शिरूं त्याआधीं ?

पापण्याआड राहीन
आंसवांवरी पोहीन
तव अंतरंग पाहीन

जर ओढाया बघेल कुणि मज तिथुनी
तर आंत दडव कवळोनी

अमरावती, ३०।७।३१

# तीन कला

[ सुनीत ]

भव्याकार समोर ठेउन उभे अस्तोदयांचे फळे
रश्मींचे भरपूर लांब कृश तूं घेसी करीं कुंचले

मेघांचे मग स्वच्छ जाड पडदे त्यांच्यावरी ठोकुनी
चित्रें रम्य चितारिसी अनुदिनीं; जीं बिंबती लोचनीं

काव्यस्फूर्ति तुझ्या हृदीं सहज हो तीं पाहतां पाहतां
उद्रेकीं रचिसी अनंत कविता तूं भावनालंकृता

आकाशावर ठेविसी लिहुनि त्या नक्षत्रमालामिषें—
पर्णीं आणि शिराक्षरीं; अमतिला तें ज्ञात व्हावें कसें ?

वीणा मंजुल वायुची तदुपरी तूं छेडिसी कौशलें
गासी गोड गळ्यावर स्वकविता आलाप घेसी खुले

वीचींचा कलनाद – तोच घुमता आवाज भासे तुझा
नेई चित्त हरून तो; न तसली कर्णांस लाधे मजा

ईशा ! चित्रणकाव्यगान असती तीन्ही कला त्वत्सुता
त्यांची मानवसंभवीं कधितरी होईल कां एकता ?

अमरावती, १८।९।३१

---

# वाहतुकी

[ भूपती खरें तें ]

मजवरी लाद तव जड वजनाचें ओझें
त्याखालीं दबुनी प्राण जाउं दे माझे

दे खुशाल अवघडुं मानेचा दृढ मणका
पाठिच्या कण्याला आणि लागुं दे ठणका

मांडींत येउं दे चालुनि चालुनि गोळे
गरगरा फिरूं दे झांपडलेले डोळे

जर कसूर कांहीं हातीं जाहली
तर हाण दंडुका माथीं तूं बली !
कर कंबर मोडुनि लाथीं धनुकली

साहीन सुखें मी जुलुम करशिल जे जे
आनंदें अर्पिन काया ही तव काजें

अमरावती १५।१०।३१

# सविकल्प समाधि

[शा. वि.]

" माझ्या प्रेमळ शाहिरा ! पुरविण्या माझी मनोवांछना
एखादें तव भावगीत मजला गाऊन दाखीवना !

शेजारीं बसल्यें तुझ्या कुतुहलें मी शांत तें ऐकत
औत्सुक्यें नयनांतल्या उमजुनी घे सर्व मदूद्गत

कां शंकाकुललोचनीं निरखिसी माझ्या मुखा राजया
जाई लेश न कां त्वदीय हृदया स्पर्शून मायादया ?

लज्जारक्त मलीन लीन वदनीं मी खालतीं पाहल्यें
कष्टानें उचलून आणि नयनें निःश्वास मी टाकिल्यें

येती पारखतां न काय तुज हीं डोळ्यांतलीं आंसवें ?
हें ओठावरलें निरागस हंसें वाटे तुला कां नवें ?

पूर्वप्रीति तुझी अपूर्व अथवा ती सर्वथा लोपली ?
ती वृत्तीमधली रसप्रवणता मूळांत कीं आटली ?

किंवा ही सविकल्प, देखुन मला, लागे समाधी तुझी
जाल्यें मी कशि आपुली जर असा तूं स्वस्थ निष्काळजी !

जातां ओढुनि मागुनी पदर कां आलाप घेसी वृथा ?
इच्छेची अवमानिल्यावर नको व्हाया अशी पूर्तता !"

अमरावती, ४।११।३१

[library stamp]

# माधवी व रसाल

[ सुनीत ]

तारुण्यें बहरे रसाल विनटे लेवोनियां पालवी
लावण्यें विलसे रसें मुसमुसे तत्सन्निधीं माधवी

एकांतांत घडे युवायुवतिंचें जेव्हां असें मीलन—
प्रीतीचा जडुनी विकार दुरळे त्यांच्यांतले कोण न ?

कामोन्मत्त बने रसाल सरशीं त्या माधवी जों दिसे !
चित्तीं माधविच्या रसाल बघुनी होई कसेंसेंचसें ! !

बोलावी तिजला सहस्र कर तो विस्तारुनी आपुले
चाले वेळित मान, देत तनुला आळेपिळे ती बळें

जेव्हां ये इतुक्यावरी धृति कशी त्यांना उरावी बरें ?
अन्योन्याप्रति आवळून हृदयीं आलिंगती तीं त्वरें !

कांपे देहलता तिची विकसती तेणें कळ्या लाजऱ्या,
रोमांचासम तद्वपूवर अहा ! मोहोरती मंजऱ्या

जाती पंचऋतू शिशीरऋतु ये सर्वस्वहारी पुढें
होती वाळुन कोळ पल्लव, गळे शोभा, फुलोरा झडे

वांचे खोड जुनें रसाल वठुनी जागीं उभें ताठलें !
राहे माधविचें शरीर सुकुनी त्या भोंवतीं वेष्टलें ! !

ओढोनी तिज एकदां सहज जों खोडास त्या पाहिलें !
होते त्यावरि वज्रलेप विळखे आलिंगनीं जाहले ! !

अमरावती, ९।११।३१

---

## निद्रागीत

[ व्यर्थ अम्ही अबला ]

कशी तुज निज न ये अजुनी ?

उदास छाया
तरंगती या
पश्चिमदिग्वदनीं

त्यजि संध्यानिल –
सवेग, कोमल
निःश्वसितें श्रमुनी

मिटती चंचल
निज नेत्रांचल
नील नव्या नलिनी

विहंगमांच्या
थिजती वाचा,
गुंगि भरे नयनीं

रमवी त्यांहीं
वनराई ही
' अंगाई ' म्हणुनी

थबकत थबकत
करि चरणांकित
वसुधातल रजनी

नागपूर, २२।१२।३३

# निद्रागीत

[ व्यर्थ अम्ही अबला ]

कशी तुज निज न ये अजुनी ?

उदास छाया
तरंगती या
पश्चिमदिग्वदनीं

त्यजि संध्यानिळ—
सवेग, कोमळ
निःश्वसितें श्रमुनी

मिटती चंचल
निज नेत्रांचल
नील नव्या नलिनी

विहंगमांच्या
थिजती वाचा,
गुंगि भरे नयनीं

रमवी त्यांहीं
वनराई ही
' अंगाई ' म्हणुनी

थबकत थबकत
करि चरणांकित
वसुधातल रजनी

नागपूर, २२।१२।३३

## क्षमस्व !

[ सुनीत ]

आपत्काल म्हणून दैवहत मी आलों तुझ्या आश्रया
मातें देखुन दुःखविह्वल तुला आली दयाला ! दया
तूं वक्षस्थलिं लाविलेंस सहजीं आत्मीयतेनें मला
झाली व्यक्त सहानुभूति कृतिनें तेव्हां तुझी कोमला !

मी गेलों उपकार तो विसरुनी, उन्मत्त झालों महा
आज्ञापालनही करूं न शकलों, तूंतें दिले दोष—हा !
माझे सर्व कृतापराध तरि तूं पोटामधें घालुनी
जन्माचें मज ठेविलेंस करुनी पुत्राप्रमाणें ऋणी !

या माझ्या अनुतापदग्धहृदया तच्छिद्र आतां कळे
आवेगीं उमडून अश्रुसरिता नेत्रांतुनी ओघळे !
माझी निंद्य कृतघ्नता मज मनीं आतां पुरी जाणवे
स्पर्शावे तव पूज्य पाद—गमतें, होवोनिया ओणवे !

येतो कंठ गहींवरून, गिळतों सायास मी आंवढे
तोंडानें म्हणतों, "क्षमस्व !" श्रवणीं जावो तुझ्या तेवढे

अमरावती, ४।१२।३१

# बलूची तरुणी

[ दिंडी ]

सडक काळे कुळकुळित तिचे बाल
बाल कसचे ते गरलमुखी व्याल !
आणि गोरे गुळगुळित ताम्र गाल
रक्त रंगाचीं नीरजें विशाल !

सरल, शेंड्याला रुंद जरा नाक
केवड्याची जणुं जर्द फोक फाक !
आणि डोळ्यांतिल बाहुल्या तजेल
गुरूशुक्रांचे लोल कीं खगोल !

उंच, सुन्दर, धिप्पाड अंगकाठी
खांब केळीचा रम्य जसा पोटीं !
रंगिबेरंगी तिपदरी रुमाल—
झांकि डोकें विस्तीर्ण तसें भाल

लेइ चुणिचा घागरा पायघोळ,
घालि सदरा अंगांत तलम सैल,
डुले पिशवी बगलेंत चामड्याची
धीट व्यापारिण तरुणि ती बलूची !

विकी चष्मे, कातऱ्या, सुऱ्या, चाकू
करिल ग्राहक तिजपुढें कोण 'कां–कूं' ?
अन्यदेशिय सामान्य नार एक
सहज भिववी येथील सर्व लोक

अमरावती, ११।१२।३१

---

# महदंतर

[ शा. वि. ]

माझ्या वाणितुनी कठोर जळती विद्युल्लता कोसळे
नेत्रांतून तुझ्या दयामृतमयी कादंबिनी ओघळे

माझ्या वागणुकींत घोर उठती रात्रंदिनीं वादळें
त्यायोगें झडती समूळ हंसरीं त्वद्भावनांचीं फुलें

मी गंभीर कधीं, कधीं कुपित वा आनंदलेला कधीं
होई ना अणुमात्र पालट तुझ्या कारुण्यवृत्तीमधीं

मी माझाच अनेकवार करितों धिक्कार संतापुनी
जासी तूं शुभ चिंतनीय वचनें माझ्या शिरीं ओपुनी

मी सामान्य असे — विकार नसती आधीन माझ्या जरा
जात्या त्यांवरतीं दिसे तव असे स्वामित्व लोकोत्तरा !

घेती जन्म तुझ्या अगाध हृदयीं शांति, क्षमा अन् दया
देवाची करुं कल्पना न मग कां मी हीन ठायीं तुझ्या ?

अमरावती, २८।१२।३१

# पुण्यस्मृति

[सुनीत]

एकांतांत विचारमग्न बसतों कोठेंतरी जेधवां
जाते आत्मपरीक्षणांत गढुनी माझी मती तेधवां
लागोपाठ जशीं भराभर चलच्चित्रें पटीं हालती
अंतश्चक्षुपुढें तशा तरळती अस्पष्ट पूर्वस्मृति

दु:खाशीं असती समस्त बहुधा संलग्न त्यांच्यांतल्या
जाती पुष्पित भावना करपुनी त्यांच्यामुळें आंतल्या !
हातीं दाबुनि मी सखेद धरितों डोकें तदा आपुलें
पाणी आणि कसेंबसें लपवितों डोळ्यांतलें तापलें

माझे कोड कितीतरी पुरविले सप्रेम नाना ! तुम्ही
लाभावें मज शांतिसौख्य म्हणुनी झालीस आई ! श्रमी
काका ! सांवरिलें तुम्ही बहकल्या चित्तास माझ्या किती
एकाचेंहि परी न जोडुं शकलों आनृण्य मी शेवटीं !

जीवाचा जड शोकभार हलका व्हावा समाधानुनी
अश्रूंना अभिषिंचितों म्हणुन मी पुण्यस्मृतींच्या दिनीं !

नागपूर, २।३।३२

# कविवर्य तांबे यांची कविता

[ दिंडी ]

भावकविता तो हृद्य अशा लेखी
 कुणी काळिज काढून ठेविलें कीं !
वर्ण पडती एकेक असे गोड
 सुधास्वादाशीं लावितील होड

करी रचना निर्दोष अशी कांहीं
 प्रश्न पडतो : कां पद्मपत्रिका ही ? :
सहज चालीची योजना अशी हो
 झुळुक वायूची काय तीपुढें ? — हो !

ध्वनी सूचक त्यांतून निघे ऐसा
 परब्रह्मांतुन चिदानन्द जैसा
अर्थ केवळ ये अवगतां मनाला
 कळे मधुमधुता कथुन कां कुणाला ?

काव्यसंग्रह — भांडार शारदेचें !
 कुणी निवडावे त्यामधील वेंचे ?
गमे त्याच्या त्या ललितलेखनीचे—
 मुके घ्यावे, धन्यत्व देत वाचे

नागपूर, २२।४।३२

# गांधर्व

[ अर्धतनू वारुळीं ]

ये ! आमोरासमोर राहूं उभे कातळावरी
बोहलें हवें कशाला तरी ?

हृदयें मिनलीं तिथें पाहिजे अंत:पट कासया ?—
विलगतादृश्य नको व्हावया !

उदयोन्मुख रविसमक्ष घेऊं शपथविधी उरकुनी
काय हो होमकुंड उजळुनी ?

गातील मंगलाष्टकें विहंगद्विज,
देतील शुभप्रद आशि मुदें सरसिज,
वाजवील सनई नादमधुर मलयज,

परस्परांच्या गळ्यांत घालूं कोमल करपाश गे !
फुलांचे हार नको वाउगे !

नागपूर, १०।५।३२

# अलंकार

[ अर्धतनू वारुळीं ]

करांत कर टाकून बसूं चल ! वनांत कोठेंतरी
निरव तूं मान तुझी मम उरीं

नीट कान देऊन ऐक मम हृदयाची टिकटिक
मनोगत पडेल तुज ठाउक

अधन म्हणुन मज नको निखंदूं, अर्पिन मी एकला
अमोलिक दागदागिने तुला

एकावलि घालिन करपाशाची गळां,
कटिभंवतीं गुंफिन बाहूंची मेखला,
मणिबंधीं वेढिन वलयांसम अंगुलां,

खरा युवतिचा अलंकार पति तोच लाभल्यावरी
काय ती इतरांची मग सरी ?

नागपूर, २३।५।३२

# नको जाऊं

[ कृष्णा मिळालि कोयनेप्रती ]

मज विचारल्यावांचुनी नको गे !
जाउं नको साजणी !

निशि उशागती जागुनी
जिव गेला मम भागुनी !
ये गुंगि अतां लोचनीं !

मधु सेवित सेवित अली
हो निद्रित पंकजदलीं
मी तेंवि तवालिंगनीं

: दूरवो न संगत तुझी :
— छळि हृदया ही काळजी
अस्वस्थ म्हणुन मी मनीं

तुज हाताळुनि पाहतों
फिरफिरुनि किती बाहतों
पद धरितों उरिं कवळुनी

जरि गेलिस लाथाडुनी
या दीनाला सांडुनी
कशि जाशिल हृदयांतुनी ?

नागपूर, १४।६।३२

## निरोपापूर्वी—

[ भैरवी ]

वाट नको पाहुं बसुन लाडके—रसाले !
शिणतिल ना उगिच तुझे मधुरमुग्ध डोळे !

मी अतिथी जणुं अवचित
—सदनीं अनुसरिन परत

बघिन सत्य केंवि तदा प्रणयमेघ वोळे !

नागपूर, २१।६।३२

# मधुरमीलन

[ अर्धतनू वारुळीं ]

दोपंजांची कडी सांधुनी दृढ कोयंड्यांत ती
अडकविसि खांद्याच्या आयती

आणि तयावर लडिवाळपणें टेकुनि हनु कोमला
निरखिसी दृक्कोणांतुन मला

अधुनी मधुनी निढळाजवळिल विस्कळलेल्या बटा
चुंबिती गालाच्या तळवटा

धुंदींत मत्त मी कवळीं जवळीं तुला
तव वदनीं तरळती पुसट छटा प्रतिपला
लज्जानिल थरकवि अधराच्या मृदुदला

घनश्याम अभिराम मनोरम अनुपम मी राम कीं
दामिनी तूं माझी जानकी !

नागपूर, १।११।१९३२

# वरपरीक्षा

[ दुर्गा ]

अयि जीवितेश्वरी प्रियकरणी !
मम अंतरंग बघ ! पारखुनी

भणंग दिसतो वरवर सागर
उरांत दडवी परि वैरागर
आणिल उपसुनि त्यास काय वर–
गे ! पाणबुड्याविण अन्य कुणी ?

कृष्णवर्ण जरि तिमिर भासतो
तरी अंतरीं तेज लपवितो
अनंत उडुगण गोचर होतो
बघ ! एक वेळ उघड्या नयनीं

वसतो निश्चल निर्विकार गिरि
परी झिरपतो निर्झर उदरीं
नीट ऐक ! रव ये कानावरि –
सिंचितां मळे तो खळखळुनी

नागपूर, ११।५।३२

# वरपरीक्षा

[ दुर्गा ]

अयि जीवितेश्वरी प्रियकरणी !
मम अंतरंग बघ ! पारखुनी

भणंग दिसतो वरवर सागर
उरांत दडवी परि वैरागर
आणिल उपसुनि त्यास काय वर—
गे ! पाणबुड्याविण अन्य कुणी ?

कृष्णवर्ण जरि तिमिर भासतो
तरी अंतरीं तेज लपवितो
अनंत उडुगण गोचर होतो
बघ ! एक वेळ उघड्या नयनीं

वसतो निश्चल निर्विकार गिरि
परी झिरपतो निर्झर उदरीं
नीट ऐक ! रव ये कानावरि —
सिंचितां मळे तो खळखळुनी

नागपूर, ११।५।३२

# उन्माद

[ वधू ही वल्ली ]

गे ! चल, ऊठ
भर बंपर काठोकाठ

दे वरवरतीं फेस तरंगूं
डोळ्यांवर दे धुंदी गुंगूं
नकोस नसत्या सबबी सांगूं        कर 'लेल्लूट'

खुशाल सुरई ओत पालथी
थेंब थेंब दे ठिबकूं अंतीं
ये ! दोघेंही होऊं साथी        कसची तूट !

निशा निशेमधिं अजुनी बरळे
चंद्रतारका करिती चाळे
प्राजक्ताचा गंध दरवळे        मन बेछूट !

तरल आपुलें आधिंच जीवन
आणि तरलतर त्याहुन यौवन
मौज मार, जरि निंदिल टोचुन        दुनिया झूट !

'काल' अभागी कालच मेली
'उद्या' अनोळखि नसे जन्मली
'आज' काय ती असे आपुली        घे ! भर सूट

अमरावती, ३०।११।३२

---

# वंचना

[ कालिंगडा ]

जा रे ! जा अदया दृष्टिआड
जा दूर कुठेंतरि सूर काढ

कशास कानीं करिसी गुणगुण ?
उगाच मागें लाविसि भुणभुण
फसावयाची न अशी मी पण
जा अन्य कुणाला भुरळ पाड

जन्मजात तूं कुटिल खरोखर
श्यामवर्ण तव बाह्याभ्यंतर
स्वर्ण मेखला झळके कटिवर
तुज नीतिअनीतीची न चाड

वंशतरूचें कठोर दारुण
पोखरिसी तूं शरीर कणकण
मृणालिनी मी मृदु मेणाहुन
मग माझा तेथें काय पाड ?

मधुपा ! न करीं मधुपान वृथा
तुला हवीना प्रतिदिनिं नवता ?
कुठें मदंतरिं ती लव आतां ?
हो हृदय रितें तें फोड फाड !

नागपूर, २३।१२।३२

# मुग्ध कलिकेप्रत—

[ बागेसरी ]

लाडके ! उमलुं नको कलिके !

घे झाकुन घे
घट्ट डोळुले
उघडुं नको इतुके !

हिरव्या कोशाच्या
कोश्यावर
लोळ अशीच सुखें !

घे अवगुंठन
मुखाभोंवतीं
जाळीदार धुकें !

हंसूं नको वा
नको रुसूं फुगुं
मारुं नको मुरके !

तूं जितुकी निष्पाप
विमल, हे—
जन पापी तितुके !

तोडतील तुज
जननीजवळुनि
गळिं लावूनि नखें !

नागपूर, २४।१२।३२

---

# स्मृति

[ मञ्जरी ]

वीणेवर फिरली कलाकुशल अङ्गुली
उद्भूत जाहली नादतरङ्गावली
तों एकाएकीं तार एक भङ्गली
झङ्कृती कर्णपुटिं घुमत परी राहिली !

—पाहिली हांसतां मन्द चटकचान्दणी
: हिरकणी जडविली गगनाच्या कोन्दणीं ! :
तों कोसळली ती अवचित पृथ्वीवरी
नेत्रांत राहिली चमक चकाकत परी !

धूपाच्या काड्या जाळुनि सुरमन्दिरीं
सद्भावें केली व्याससभा साजिरी
जाहली तयांची राख शेवटीं परी
घमघमत राहिला सुरभि नासिकान्तरीं !

प्रणयानुबन्धनीं जीवाला गोंवुनी
केलेंस ' आपुला ' मजला मायाविनी !
परि दिलेंस अन्तीं दूर दूर ढकलुनी
स्मृति असे राहिली कायमची ती मनीं !

नागपूर, २४।१२।३२

# याचना

[ अगोट—गज्जल ]

कधींमधीं सदनीं येत जा मनोरमणा !
नको वृथा शिणवूं रोज आपुल्या चरणां

प्रभात रम्य हंसो      वा निशीथ घोर असो
मनोज्ञ मूर्ति तुझी दाखवीत जा नयनां

कुणी लकेर भरो      कोणि कण्ठशोष करो
तुझी रसाल गिरा ऐकवीत जा श्रवणां

कुठें सुगन्ध सुटो      वा कुठें कुवास उठो
त्वदीय मादकता दे मला श्वसूं तरुणा !

मधूमधीं वसती      माधुरी करो, परि ती —
मला अनूभवुं दे चुम्बुनी तुझ्या वदना

जनांत कांहिं घडो      कीं रणांत कांहिं अडो
तुझ्या मनासह दे एकरूप होउं मना

उदारधी वरुणा !      रे प्रदीप्तभा अरुणा !
अभागिनीवर या वर्षवीत जा करुणा

नागपूर, ७।१।३३

## मीनाक्षी

[ लाज मेरी आज हरी ! आइके बचाओ ]

जादु तुझ्या लोचनांत जादुगारिणी ! ही
काय करिल ? काय नाहिं ? सांग ! काय ग्वाही ?

खचित तुझें कसब अजब
गजब करी सहज लकब
ती तिरपी जिव घे ढब सर्व और कांहीं ! !

सरळ धरिसि नच कमान
लाविसी न नीट बाण
मारशील नेम कसा मुळिंच नेम नाहीं !

नागपूर, ८।१।३३

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.
स्थळ प्रत
सं. ......... नं. .........
ता. .........

# वञ्चिता

[ मोहिनी ]

“–गोड गोड देउनि मातें रोज भूलथापा
कापलासना तूं अन्तीं कंठ ? मूर्तपापा !

रोखिलेस माझ्यावरतीं विषयधुंद डोळे
टाकिलेंस देहाभंवतीं चिवट मोहजाळें
फासिलेस चातुर्यानें त्यांत प्राण भोळे
आणि हाय ! कौमार्यावर घातलास छापा

रे ! तुझ्यामुळें मम गेला जन्म सर्व वाया
तूं मला परी दो घडिंची दाविलीस माया
शून्य यापुढें झालें हें विश्व जिवाला या
केंवि वदन लांच्छित दाऊं व्यथित मायबापां ?

काय पूर्वजन्मांतरिंचा साधलास दावा ?
तुच्छ मानिलेंसी माझ्या विमल भक्तिभावा !
उमगला न मातें आधीं पूर्ण तुझा कावा !
लाधतांच संधी चावा घेतलास सापा !

प्रणयचिंतनें तीं आतां ओसरून गेलीं !
शपथयुक्त वचनें सारीं बाष्परूप झालीं ! !
विविध विलसनें तीं–तींही स्वप्नरीं निमालीं !
जा इथूनि जा कर काळें, करिन मी विलापा”

नागपूर, १२।१।३३

## संगमोत्सुक

[ असावरी ]

राहूं दे तव शृंगारसाज
ये ! अधरसुधा मज मधुर पाज

तमालश्यामल वर्ण मनोरम
अरुणोपम शुभ भालीं कुंकुम
कचकलाप शिरिं कस्तुरिकेसम
मग कृत्रिमतेचें काय काज ?

दीप्ति लोचनीं ही स्निग्धोज्ज्वल
प्रफुल्ल वदनीं स्मित हें चंचल
छटा कपोलीं ही लव पाटल
ही थरके अङ्गाङ्गांत लाज

शुक्रतारका गहन तमोयुत
सरस सरोजनि शैवालावृत
मनोज्ञ तूंही भूषाविरहित
कां घेसि वृथा नटवेष आज ?

नागपूर, २१।१।२२

# तुझा सहवास

[ दिंडी ]

दलित पुष्पाच्या अन्तरीं सुवास
तसा माझ्या हृदयांत तुझा वास

आणि सागरिका गाइ जसें गीत
तसा होई आवाज तुझा ज्ञात

कला चन्द्राची शुभ्र सैकतांत
तुझें मन्दस्मित तेंवि गमे मूर्त

स्वच्छ सलिलीं तिरतात जसे मीन
तशा नयनीं तव बाहुल्या अजाण

धूलिधूसर रजनी जशी दिनासी
मनाला तूं गोंविसी तशी केशीं

घेइ सन्तत तें एक तुझा ध्यास
तुझा सुखकर सहवास हवा त्यास

नागपूर, १३।२।३३

# शाश्वत भेट

[ सुनीत ]

छायाचित्र कशास भेट मजला देसी तुझें ? श्यामले !
चित्ताच्या पटलीं अगोदरच तें आहे पहा ! रेखिलें
एकान्तीं बसतां अनावर तुझी होते स्मृती जेधवां
घेतों नेत्र मिटूनि आणि बघतों मी चित्र तें तेधवां

घेसी रंग कशास ? आणि धरिसी बोटांत कां कूर्चिका ?
माझें चित्र चितारतेस ? तुजला तें पूर्ण साधेल कां ?
काढाया बसलीस ? तूंच दिससी चित्राप्रमाणें परी !
राहूं दे तव चित्रबित्र चलना ये ! भेट दे सत्वरीं

चित्रें पत्रपटावरील पळत्या कालावधीसन्मुख —
आहे याच दशेंत राहतिल गे ! केंवी चिरस्थायिक ?
प्रेमोपायन अर्पितेस मजला त्यांचें वृथा कासया ?
कांहीं शाश्वत दे ! अशाश्वत नको प्रेमीजनालागीं या ! !

प्रेमाची प्रतिमा तुझी मज पुरे जी मी हृदीं रेखिली !
अन्तश्चक्षुविना कुणी न अजुनी ती तत्वतां देखिली ! !

नागपूर, ६।३।३३

# कुलीनता

[ मञ्जरी ]

सौन्दर्य अलौकिक खचित तुझें चान्दणी !
तेवती अखण्डित स्नेहदीप लोचनीं
परि जनन तुला दे घोर कृष्ण यामिनी
कटु सत्य कसें हें जावें स्मरणांतुनी ?

माधुर्य खरोखर अनुपम तव माधवी !
रुचि रसना प्रतिपळिं नवी नवी अनुभवी
परि जन्म तुझा हो दूषित द्राक्षोदरीं
स्थिर घटना केंवि न राहिल ही अन्तरीं ?

सौकुमार्य तव निःसंशय जगिं कमलिनी !
वपु पुलकित होई सहज करस्पर्शनीं
तुज कर्दमयुत पुष्करणि प्रसवी परी
हा योग अगोचर केंवि करावा तरी ?

नागपूर, ७।४।३३

---

# निराशा

[ पतितपावन नाम० प्रमाणें ]

भावांचे धागे
मुरडुनी
गोफ गुंफिला गे !
गांठ परी निखळुनी उकलला पीळ पीळ वेगें

प्रीतीचें पाणी
सिंचुनी
फुलविलि फुलराणी
धग लागुनि पाकळी पाकळी गेली परि सुकुनी

स्नेहाची ज्योती
ठेविली
अभंग पाजळती
किरण किरण परि गेला विझुनी झुळझुळत्या वातीं

दृढतम बन्धांनीं
विरचिलें
मन्दिर सातखणी
कण कण गेला ढासळुनी परि कोसळुनी अशनी

परस्परीं रमलों
विलसनीं
नित्य नव्या भ्रमलों
तिरस्कृती उपजुनी शेवटीं गमलें कीं श्रमलों !

नागपूर, ८।४।३३

---

# भिकारी

[परज]

फिरफिरुनी तो आला दारीं
घालविला परि मी माघारीं

हृदयविदारक आर्त रवानें
भावमधुरता ओतुनि त्यानें–
एकतारिवरि म्हटलें गाणें
दाखवीत निज वादनकुसरी

त्याच्या उघड्या मलीन देहीं
नव्हती चिरगुटचिंधी एकहि
दरिद्रता अशि अवलोकुनि ही
गणिलें मी कुणि त्यास भिकारी

जातां जातां परी तयानें
केलीं वरतीं सहज लोचनें
प्रभा फांकली आंतिल तेणें–
ओढ लागली मला अंतरीं

भास तयाचा हो जागेपणिं
दिसे आकृती शयनीं स्वप्नीं
भेटे न परी स्वयें येउनी
तडफडतो हा जीव शरीरीं !

नागपूर, ११।४।३३

# विपरीत वर्तन

[ गज्जल ]

डाव असा हा उलटा टाकिसि कां तूं ? सरले !
प्रेम तुझें यापुढतीं कायमचें वा सरलें ?

भाव वरी एक तुझा       वागविसी आंत दुजा
—गुंतविसी दाखवुनी रंग मला कां वरले ?

पाहसि तूं—: निद्रित मी    गाढ अशा मोहतमीं:—
येइ परि जाग मला ओस पहा ! ओसरलें

घालसि कां भूल वृथा ?    बोलसि कां बोल रिता ?
टाळुनही राहिल कां अंतिं असें जें ठरलें ?

न्याहळिसी चोरुनि कां     कोमजल्या खिन्न मुखा ?
ओळखतां येइल कां चित्त तुला सांवरलें ?

जीस जगीं नाहिं तुला      प्रीति दिली भेट तुला
योग्य असें कर्म तिला आजवरी आचरिलें

तूं असती लोल परी     सर्व तुला काय परी !
काय कुणी अंतरलें ! काय कुणी वा तरले !

नागपूर, १२।४।३३

---

# शंकाकुल पार्वतीबाईसाहेब पेशवे [मुद्रिका]

"घ्यावा तरि आतां कुठें शोध आपुला ?
ना कळे : करावा केवी शांत हा जीव तापला ? :
धुंडिले देश परदेश, पाहिलीं वनें,
जाहल्या गिरिगुहा, नाहीं कांहींहि ठेविलें उणें
अस्तित्व ज्ञात आपुलें न होई परी
दुग्ध्यांत सांपडुनि तेणें मी ओढवल्यें बावरी !
क्षणिं : असाल जीवित : गमे, गमे : मृत : क्षणीं
ताजव्यापरी मन राही हें शंकित आंदोलनीं !

रणशूर पाय काढाल रणांतुन कसें ?
मानवेल मानधनाला कां घृणित जिणें हें असें ?
कीं जिवें धरुनि दुस्मान नेइ आपणा ?
परतलांत आपण येथें निसटून तेथुनी पुन्हां ?
परि नाना म्हणती, "कुणी येइ तोतया"
ही काय असूया त्यांची ? वा मन्मति मायामया ?
शठ धूर्त कुटिल हे महा राजकारणी !
भरंवसा धरावा यांचा निर्धास्तपणें जगिं कुणी ?

अज्ञातपणाचा असा लाभ घेउनी
चकवाया टपती मातें ठक वंचक रात्रंदिनीं
परि डाव तयांचा पुरा पुरा जाणुनी
मुत्सद्दी राहति सारे तत्पर मम संरक्षणीं

एकदां वाटतें : नसे कुणाचें कुणी :
वाटतें पुन्हां : चुकत्यें कीं मी दिशाभूल होउनी :
मन वेडें !—आशा जिवट सुटे ना तया,
भेटे न आपुली मूर्ती, देवासहि ना ये दया !

चिंतातुर बसत्यें कुठें एकटी बरी
सारख्या कुशंकाशंका थैमान घालती शिरीं !
म्हणुनी जो बसत्यें जनीं कुठें घडिभरी
उभविती मनोरे नाना ते तर्कवितर्कांवरी !
मृगजलाप्रमाणें आस जिवा लागते
आभास क्षणिक होती हा ! पावती नाश अंतिं ते
जागेपणिं दिसतें सदा स्वप्न आपुलें !
निद्रेंत नवल ना ! आयू स्वप्नांत सर्व चाललें !

फणि वेणींतुनी फिरवित्यें पहाटे जधीं
कल्पना अमंगल नाथा ! या हृदयीं सलते तधीं
भालावर कुंकुमटिळा मिरवित्यें परी
अहिवेपण होई माझें असुनीही नसल्यापरी !
सौभाग्यसूत्र घालित्यें जरी हें गळां
वाटतें : ओघळे खालीं कीं मणी मणी त्यांतला ! :
करिं वाजवित्यें कांकणें वरीवरि किती
वाटतें : वाढवुनि त्यांचा सांडतो चुरा भोंवतीं ! :

मन चंचल — पारा जसा कांहिं वाहता !
वा मान मरालाची ! कीं अहि वक्राकृति धावता !
अडकवूं शके त्याजला कोण बंधनीं ?
तें पिसाट वाऱ्यावाणी भिरभिरे पोकळींतुनी !
किती तरल ! वेगवति किती तयाची गती !
तीपुढें किरण सूर्याचे पांगळून रेंगाळती !
भलभलत्या अष्टौप्रहर रची कल्पना
वैरी न चिंति तें चिंती, दे प्राणांतिक वेदना

पक्षिणी खचित मजहुनी भाग्यवंत या
ओलांडुनि सागर जाती जिवलगास गांठावया !
श्रद्धेचे डकवुनि पंख मीहि जाउं कां ?
कीं जोगिण बनुनी घालूं पालथा मुलुख पारखा ?
होईल भेंट आपुली जनीं वा वनीं
जरि तिथें न झाली; आहे तरि होत प्रत्यही मनीं
कीं सगुण रूप आपुलें निर्गुणी मिळे ?
मिळवुं कां तेंच मी आतां निष्काम भावनाबळें ?"

नागपूर, १८।४।३३

---



७

# प्रेमयोग

[ पतीतपावन नाम ऐकुनी ]

कुठल्या कुठुनी तुला दूरवर आलों भेटाया लाडके !
निरासुनी परततों मागल्या पाउलींच परि या
जीव उभारी धरून होती आशा हा वेळ अंतरीं
झाली वाळुनि चोळामोळा तिची फूलवेल
भवितव्याची रम्य आकृती झाली निःशेष शेवटीं
अस्थिहि जळुनी तिजसह, पडली राखेची रास

फासुनी हीच सर्वांगीं
प्रेमाचा बनतों जोगी

गळां मनोमय तुझ्या मिठीची घालोनी माळ रेशमी
नांव घेत तव वणवण फिरतों मी रानोमाळ

समाधान परि इतक्यानेंही जिवास लाधे ना जिवलगे !
धुनी पेटवुनि तव दाराशीं धरितों मी ध्याना
प्रेमावांचुन इतर दवडितों विकार मी पार दूरवर
तव मूर्तीशीं करितों मी मम चित्त तदाकार
अधुनी मधुनी दिव्य होय मज तव साक्षात्कार देवते !
आणि भास हो फळास येइल तप हें निर्धार

विश्वास बाणतो देहीं
येईल पुढें अनुभवही

अवलोकुनि तव हावभाव मज खरोखरी वाटे नेहमीं
कीं नेशिल मम चित्त ओढुनी नयनांच्या वाटें

नागपूर, १२।५।३३

---

# मुग्धा

[ शार्दूलविक्रीडित ]

कांहीं औरच मुग्धतेमधिं तुझ्या आहे सखे ! माधुरी
वातोत्स्फूर्त मुळीं–! करील तिजशीं स्पर्धा कशी वैखरी ?

ओठांची मृदु हालचाल सुचवी निःशब्द संभाषण
होई तीसह गोलगौर वदनीं भावच्छटाचित्रण

या प्रश्नार्थक बांकदार भुंवया आकर्ण आकृष्टुनी
अन्तर्गूज जणों अचूक पुसती सम्भ्रान्त आश्चर्युनी !

रेषा नाजुक दोन तीन निटिलीं होती तदा मुद्रिता
स्पष्टत्वीं करिती विभावित तुझी त्या अन्तराव्याजता

दृष्टीचीं रमणीय कांतिमय हीं सस्नेह विक्षेपणें
सौख्याचें जणुं शान्तशीतल सदा संवर्षती चान्दणें !

होती पुष्पदलें निमग्न अनिलीं संमीलनोन्मीलनीं–
लज्जाव्याकुल तेंवि दंग असती या पापण्या नर्तनीं

केंवी कोमल कंप हा थरकवी नासापुटांना — पहा !
हास्याची विलसे कळी चिमुकली डाव्या कपोलीं अहा !

ग्रीवा हंसिपरी फिरूनि फिरुनी मागेंपुढें वेळुनी
दे होकार रुकार आणि जिव्रणी घे जीव आन्दोलुनी

आविर्भाव निसर्गनागर असा चित्री तुझी चातुरी
हो उद्भूत अभूतपूर्व सहसा संवेदना अंतरीं

होई उत्कट भावनाविकल मी अस्वस्थता खेळवी
हांसे चन्द्रकला वरीं उदधिला खालीं परी हेलवी

नागपूर, ३०।५।३३

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं....... नं.......
ता....... ठाणें.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.

# युवक

[ गज्जल ]

एकदां खरें अगदीं सांगना मला युवका !
दृष्टिचा तुझ्या गहिरा रंग कां असा इतुका ?

खास बैठकींत कधीं वाहवून चंचल धी
घेतलास माधविचा काय चोरटा घुटका ?

प्राशलीस वा नयनीं रागिणी कुणी रमणी
काळजास काय तुझ्या लागला तिचा चटका ?

भृंग पद्मिनी भंवतीं तेंवि तूं तिच्याच रतीं !—
मात्र साळसूद वरीं आव आणिसी लटका !

प्रेमभंग होउन कीं मत्त मूढ तूं सनकी
घालसी घशांत कुठें काय घातकी गुटिका ?

—: कोण ? कोठली कुमरी ? काय ? आणि केंवि करी ? :—
राहि आजच्या मितिची सर्व माहिती तुज कां ?
ऐकतांच स्फूर्तियुता भावरम्य काव्यकथा
देखतांच चित्रपटा येइ कां तुला झटका ?

दाविसी पुराणमतीं तूं तिरस्कृती पुरती
नीतिशारदासहितीं कां उडे तुझा खटका ?

प्रीतिचिंतनांत सदा मोद हो त्वदीय हृदा
त्याविना न जाय रिती एक कां तुझी घटिका ?

नागपूर, ३१।५।२३

---

## हृदयपरीक्षा

[ भूपाली ]

हृदय दाउं का तुला उकलुनी ?
तूंच पहा ठेऊन एकदां हात इथें आपुला

स्पन्दन चाले कसें तयाचें ?
तुझ्याचविषयीं त्यास येवढा लळा, कळवळा — दिसे

खोटें तुज वाटतें काय हें ?
ओढ त्यास बाहेर आणि बघ तूंच खरें काय तें !

बघशील त्यास तूं विकसित कमलापरी
दिसतील प्रफुल्लित भावदलें साजिरीं
टपतील पडाया तीं तव पायांवरी

दाटुन येइल गळा तुझा मग
अनुतापाची पवित्र सरिता ओघळेल घळघळा

नागपूर, १९।७।३३

# शाश्वत प्रीति कीं अशाश्वत प्रणय ? [ पतितपावननाम ]

बादलबिजली परस्परांना आलिंगन देती
   काय ती चिरकालिक प्रीती ?
क्षणीं बिलगतीं क्षणीं विलगती असती चपलगती
   अशाश्वत प्रणय तो ! न प्रीती ! !

आतपवर्षा अन्योन्यांचें दर्शनसुख घेती
   काय ती चिरकालिक प्रीती ?
दृष्टादृष्ट न होय पुरेपणिं अन्तर्हित होती
   अशाश्वत प्रणय तो ! न प्रीती ! !

चुंबनदानीं दिवसयामिनी दोघेंही रमती
   काय ती चिरकालिक प्रीती ?
ओठांना नच ओठ लागले एकिकडे सरती
   अशाश्वत प्रणय तो ! न प्रीती ! !

तुझ्या नि माझ्या अधुनी मधुनी भेटिगांठि पडती
   काय ती चिरकालिक प्रीती ?
अनुनय, भाषण भरा न ये तों तुटातुटी घडती
   अशाश्वत प्रणय तो ! न प्रीती ! !

नागपूर, २९।७।३३

---

## कळी खुडणारास— [ भूपाली ]

नको चुरगळूं कळी चिमुकली
उमलूं देना तिची हळूहळु एक एक पाकळी

नेउं नको कर मुळीं मृदु तळीं
नख देउनि चिमटाया अससी काय क्रूर तूं कली ?

तरणिचें तेज तिज मनमुराद सेउं दे
अनिलाचें भरुनी चषक पिऊं दे मुदें

न्हाऊं दे हिमजलीं सकाळीं
दिनानुदिन दे वाढुं धरणिच्या उदार वत्सल कुळीं

अजुनि असे कुमरि ती मुग्ध अति
प्रणयप्रसाधनिं तिची लवभरी कुठुनि असावी गती ?

सहजच ती पाहते हांसते
असती अगदीं अमल, निरागस विविध तिचीं चेष्टितें

विंधिलें न अजुनी हृदया केशरशरें
नच शिरांशिरांतुनि मधुरस वा संचरे

विकसन झालें नसे पूर्णसें
मधुलोलुप मधुपांचे गण मग संयुत होतिल कसें ?

खरे कलाभिज्ञ ते जाणते
सौन्दर्याविष्कार केधवां होई ज्यां उमजते

अर्धस्फुट चारुता दिव्यता
दूर अंतरावरुनि निरखिती जे मार्मिक तत्वतां

कौमुदी विदेही चकोर कवळी जसा
रससेवन करिती निर्विकल्प जे तसा

आनंदित होउनी उन्मनीं
निमग्न होती कायावाङ्मन जे त्याच्या चिंतनीं

नागपूर, २४।८।३३

## ऐकान्तिक प्रेमिकास— [ जोगी ]

"–हो जागा ! आतां जादुगरा !
जा ! वेगीं माझ्या सोड घरा !

रात्रभरी मी तुजसह रमल्यें
विविध विलासीं, लास्यीं भ्रमल्यें
रमुनी भ्रमुनी अगदीं श्रमल्यें
रे ! आला मातें वीट पुरा

शीतकराला लोटी रजनी
मधुपालागीं त्यागि सरोजनि
केंवी कवळूं तरि मी अजुनी ?
घे मागें घेना दोन्ही करां !

भावोन्मादक ज्योत्स्ना लोपे
हृदयोत्साहक आभा तळपे
पुण्यें आतां गमतिल पापें
या प्रेमा नोहे मोल जरा !!

प्रीती निवसो हृदयिं अमूर्ता
इकडिल तिकडे नलगे वार्ता
ऐकाया मग वाणी आर्ता
ना येई कोणी ' लाल ' खरा

दोघें जाऊं प्रीतिपथीं गा !
सुखदु:खांच्या भोगूं भोगा
उभयांच्या या दृढ संयोगा
ना कोणी सत्ता घातकरा !"

नागपूर, ३०।८।३३

# निश्चिति

[श्रीविधिहरिहर]

फुलें करूं गोळा ?
कशाला—
आणि वहूं माला ?
हिसकावुन ती क्षणांत करशिल तूं चोळामोळा !

मिसळूं रंगछटा ?
कशाला—
चित्रूं आणि पटा ?
फिरवशील तूं सहज आपुला कर ओला उलटा !

तंतूंना छेडूं ?
कशाला—
स्वरलहरी काढूं ?
पाहशील तूं चरणाघातें तुंबीफल फोडूं !

दुवे दुवे बांधूं ?
कशाला—
आणि गोफ सांधूं ?
गुंता करुनी जाशिल त्याला तूं चेंदूंमेंदूं !

प्रेमभाव जमवूं ?

कशाला—

मन वेडें रमवूं ?

झटशिल कुटिला ! अविरत कलहीं तूं त्यातें विटवूं !

नागपूर, १२।९।३३

# सागरसंगीत

[ भूपाली ]

विशाल वक्षस्थलीं आपुल्या
वसुंधरा सुंदरी
सागरवीणा घेउनि रिझवी
मानस सप्तस्वरीं

वायुवीचि कोमला करांगुलि—
चारुचतुर चंचला,
तरल तरंगांच्या तारांवर—
फिरवुन, दावी कला

श्रुतिसुभग उमटती निनाद वरच्यावरी
ते विलय पावती गभीर गगनोदरीं

घळांखनाळांतुनी कांहिं परि
प्रतिध्वनित होउनी
करिती गुंजन कर्णपटांवर
सकंप आघातुनी

वादन तें ऐकतां ऐकतां
संध्या हो निद्रिता
अधांतरीं तारका विस्मिता
झुळती मंदस्मिता

हंसतवदन चंद्रमा          तोहि ये
  उजळित श्यामल तमा
आणि करी साजरी शारदी
  शान्तशीत पूर्णिमा

  आल्हादुन डुलती तालतमालद्रुम
  करि व्यक्त मुदित मन सुवर्णरज चमचम

विलोकुनी रंग हा          वादना—
  उत्तेजन ये महा
सप्तस्वर सम्मीलित होउनि
  एकरव निघे अहा !—

त्याच्या तालावरी          जोजवी
  फणींद्र वसुधा शिरीं
  हिंन्दोलीं त्या अमित बालकें
  निमग्न स्वप्नांतरीं !

'अंगाई' गाउनी          थोपटी—
त्याला मधु यामिनी
मूर्तिमती माता वत्सलता
तीच मनोमोहिनी !

—: या ! निजा स्वस्थ ! या बिलगा नीलांचला !
  क्षण जीवनकलहा विसरा:— या मंजुला—

गीतिकेस मिसळवी एकालयें
ती त्या अविरत रवीं
त्याच सुरावर गुणगुणतां कृति
तन्मय होई कवी

नागपूर, ११।१०।३३

---

## श्रीमहाराष्ट्रशारदेस—

[ मंदारमाला ]

ज्यांचीं चिरंजीव काव्यें जगीं या जगीं ते चिरंजीव वागीश्वर
तो मानसन्मान मातें कुठोनी ? न त्यायोग्य मत्काव्य हें नश्वर

श्री शारदे ! रंगले रंगती वा तुझ्या सेवनीं जे तवोपासक
त्या सत्कवींच्या—तुझ्या पाइकांच्या पदींचा असे दीन मी सेवक

त्या श्रेष्ठ त्या ज्येष्ठ वागीश्वरांच्या कृतींमाजि जें कांहिं मीं वाचलें
त्यांतून या मंद धीमाजि माझ्या अये ! अल्प वा स्वल्प जें वांचलें

तें मी नवें रूप देऊन आतां तुला भक्तिभावें करीं सादर
माते ! करीं त्वत्कृपापात्र मातें करूनी सवात्सल्य तत्स्वीकर

आनंद, संतोष—स्वर्गीयसौख्यें तुझ्या ठायिं एकत्र हीं मंगले !
मच्चित्त लोभोनिया या गुणांना म्हणूनीच गानीं तुझ्या रंगलें

तूं कर्म, तूं धर्म, तूं शर्म माझें तुला वाहिलें सर्व मी संमुदें
मी हीन, मी दीन पादांबुजांशीं तुझ्या नेहमीं लीन श्रीशारदे !

पांचगणी, १०।६।२६

ग्रंथ संग्रहालय. स्थळ प्रत ....नं.......

— १ —

## कांहीं नाट्यप्रकारात्मक कवितांचीं कथासूत्रें

— २ —

## प्रथम चरणांची सूचि

## —कांहीं नाट्यप्रकारात्मक कवितांचीं कथासूत्रें—

### अ. क्र. ५. येणार कोण तरि आज ? ( ७ )

विजयी पतीच्या आगमनाची उत्सुकतेनें वाट पाहत असणाऱ्या वीरांगनेस तिची सोबतीण चिडवीत आहे. ( रजपूतशाहींतील एक काल्पनिक प्रसंग. )

### —१८. नजरभेट ( २४ )

चक्रवर्ती **नेपोलियन** याची स्त्री **जोसेफाइन** ही मूळची एका मळेवाल्याची पोर. पुढें ती सम्राज्ञी बनून **आल्प्स** पर्वतावर गेली असतांना तिची व तिचा पूर्ववयांतील प्रियकर **वुइल्यम स्टुअर्ट** यांची दृष्टादृष्ट झाली. प्रस्तुत गीत म्हणजे त्या प्रसंगींच्या त्याच्या मनःस्थितीचें शब्दचित्र. ( 'चक्रवर्ती' नेपोलियन. ंड १ ला. वि. ल. भावे. )

### —२५. प्रणयवंचितेची इच्छा ( ३६ )

**अनारकली** ऊर्फ **नादिराबेगम** ही **अकबराची** एक स्त्री होती. **जहांगीरशीं** इचा कांहीं संबंध उघडकीस आल्यानें **अकबरानें** तिला भिंतींत चिणून मारिली. ( ज्ञानकोश. विभाग ६, पृष्ठ १७२ )

### —६५. वंचिता ( ८६ )

**कौंट टॉलस्टॉय** यांच्या **रिसरेक्शन** कादंबरीची नायिका **कटुशा** इच्या अधःपातास नायक **डिमीट्री** हा कारणीभूत होतो. पुढें अपमानास्पद जीवन कंठित असतांना तिच्यावर खुनाचा आरोप लादण्यांत येतो; व तिला बंदिवास पत्करावा लागतो. तेथें पश्चात्तापानें होरपळलेला **डिमीट्री** तिच्या भेटीस जातो. त्या वेळच्या तिच्या मनःस्थितीचें शब्दचित्र.

## —७३. शंकाकुल पार्वतीबाईसाहेब पेशवे ( ९५ )

पानपतांत **भाऊसाहेब** बेपत्ता झाले. त्यानंतर **तोतयानें** बंड उभारलें. तें राजकारणी **नानांनीं** मोडलें. परंतु शेवटपर्यंत **भाऊसाहेब** ह्यात आहेत अथवा कामास आले या गोष्टीचा निर्णय त्यांस देतां येईना. या अवधींत **पार्वतीबाईसाहेबांच्या** मनाची जी स्थिति झाली तिचें शब्दचित्र.

## —प्रथम चरणांची सूचि—


| | पृष्ठ |
|---|---|
| अयि जीवितेश्वरी प्रियकरणी ! | ७८ |
| आतां संथ दिव्यापरी मिणमिणे भूपृष्ठ दृष्टीपुढें | ३० |
| आपत्काल म्हणून दैवहत मी आलों तुझ्या आश्रया | ६७ |
| ओसाड आडरानीं राहो माझें भिकारडें थडगें | ३६ |
| अंतरंगकमल खुले | १ |
| उठून एकदां तरी गडे ! जरा पहा, बरें | ३२ |
| एकदां खरें अगदीं सांगना मला ? युवका ! | १०२ |
| एकाएकि कधीं कधीं मम मनीं उद्विग्नता येउनी | ३७ |
| एकांतांत विचारमग्न बसतों कोठेंतरी जेधवां | ७१ |
| करांत कर टाकून बसूं चल ! वनांत कोठेंतरी | ७४ |
| कधींमधीं सदनीं येत जा मनोरमणा ! | ८४ |
| कशी तुज नीज न ये अजुनी ? | ६६ |
| कांहीं औरच मुग्धतेमधिं तुझ्या आहे सखे ! माधुरी | १०० |
| काळ्या ठिकर त्या खडकावर निर्भय राहुन उभी | ४६ |
| कुठल्याकुठुनी तुला दूरवर आलों भेटाया | ९८ |
| कुण्या सरितापात्रांत खोल जागीं | ३४ |
| गे ! चल, ऊठ भर बंपर काठोकाठ | ७९ |
| गोड गोड देउन मातें रोज भूलथापा | ८६ |
| घ्यावा तरि आतां कुठें शोध आपुला ? | ९५ |
| चल, उचल तुझीं अचल लोचनें वरतीं | ६० |
| छायाचित्र कशास भेट मजला देसी तुझें ? श्यामले ! | ८९ |
| जातांना पथिं तोंडओळख जरा झाली तुझ्याशीं कुठें | १७ |
| जादु तुझ्या लोचनांत जादुगारिणी ! ही | ८५ |
| जा रे ! जा अदया दृष्टिआड | ८० |
| जेव्हां चोहिंकडून व्योम अवघें माझ्यावरी फाटलें | ४५ |

| | पृष्ठ |
|---|---|
| ज्यांचीं चिरंजीव काव्यें जगीं या जगीं ते चिरंजीव वागीश्वर | ११५ |
| डाव असा हा उलटा टाकिसि कां तूं ? सरले ! | ९४ |
| डोंगराआड लइ तेज लवतेया लव लव ईज | ५६ |
| डोळे निश्चल लागती तव पदीं ( तूंतें कळावें कसें ? ) | १२ |
| तव कानीं देती शोभा कनकाचे कर्णपूर | ५७ |
| ताई ! राजा हा तुझा गोजिरवाणा छान | ४३ |
| तारूं ? कसें तारूं ? | ६१ |
| तारुण्यें बहरे रसाल विनटे लेवोनिया पालवी. | ६४ |
| तूं बाहू पसरून घट्ट धरितां पोटीं मला ओढुनी | १४ |
| त्या जाळिदार बुरख्यांतुन बघसी कां चोरुन मारून ? | २१ |
| दलित पुष्पाच्या अंतरीं सुवास | ८८ |
| दोपंजांची कडी सांधुनी दृढ कोयंब्यांत ती | ७७ |
| दृष्टिकोणांतून कां तूं पाहिलें माझ्याकडे ? | ५२ |
| दृष्टि ठेउन नासिकाग्र असतां तो देवताराधनीं | २३ |
| नको चुरगळूं कळी चिमुकली | १०६ |
| न देसी जरी भेट गा ! कासया– | २८ |
| नृपतिनंदिनी ! येसि कुठें या विपिनीं ? | १५ |
| नमन साष्टांग जनि ! न्यायनयशालिनी | २ |
| पुष्पकेतना ! आवर शर आवरना ! | ३८ |
| प्रासाद नको !–फार बरा जीर्ण तणारा ! | ५३ |
| फिरफिरुनी तो आला दारीं | ९३ |
| फुलपाखरापरि साजसी अयि रूपयौवनमंजरी | २६ |
| फुलें करूं गोळा ? | ११० |
| बादलबिजली परस्परांना आलिंगन देती | १०५ |
| भावकविता तो हृद्य अशा लेखी | ७२ |
| भव्याकार समोर ठेउन उभे अस्तोदयांचे फळे | ६१ |

पृष्ठ


भावांचे धागे ९१
मजवरी लाद तव जड वजनाचें ओझें ६२
मज विचारल्यावांचुनी नको गे ! ७५
मदंगातें आतां मलयपवना ! स्पर्श न करीं ५०
मधु स्वप्नसुखी दंगली
माझें शिक्षण निर्विकल्प अगदीं व्हावें म्हणोनीचना ? ५५
माझ्या प्रेमळ शाहिरा ! पुरविण्या माझी मनोवांछना ६३
माझ्या वाणितुनी कठोर जळती विद्युलता कोसळे ७०
ये ! आमोरासमोर राहूं उभे कातळावरी ७३
येई न आज कशि नीज ? ७
ये तापी तिकडून ती, इकडुनी ये ही पयोष्णी अशी ४०
राहूं दे तव शृंगारसाज ८७
रे ! थांब, नको गोफण ती उंच उगारूं १८
लाज लाज लाज गडे ! लाज एकदां ४८
लाजेल गुलाबी सांज २०
लाडके ! उमलुं नको कलिके ! ८१
लेई अंशुक लाल ही भरजरी, काषाय ती धूसर १३
वलज हें हले गे ! सळसळुनी ४
वाट नको पाहुं बसुन लाडके–रसाले ! ७६
वादिच्या सांगून झाल्या जों न तक्रारी पुऱ्या १०
विशाल वक्षस्थलीं आपुल्या ११२
विश्वाचा अधिभूत तो बहुविधा निर्मी मनोज्ञाकृति ९
वीणेवर फिरली कलाकुशल अंगुली ८३
सडक काळे कुळकुळित तिचे बाल ६८
सहज भेटतां जरा हंसून सुंदरी ! २४
सहज लीलेनें झाडला तमंचा ५८

पृष्ठ


| | |
|---|---|
| सौंदर्य अलौकिक खचित तुझें चांदणी ! | ९० |
| हालचालिवर माझ्या बारिक देखरेख राखिसी | ५९ |
| हो जागा आतां जादुगरा ! | १०८ |
| हृद जाहलें शतदां द्विधा विनवोनिया तुज सुंदरी ! | ११ |
| हृदय दाउं का तुला उकलुनी ? | १०४ |
| हृदय मृणालिनि ! कधिं न करिं खुलें | २९ |



४९४९

REFBK-0004949

REFBK-0004949

# संकल्पित प्रकाशनें

— १ —

कृष्णेच्या खोऱ्यांत

( प्रादेशिक वर्णनात्मक खंडकाव्य )

— २ —

दंहिवर

( स्फुट कवितांचा कलाप

— ३ —

कुणाल कांचना

( मुक्त छंदात्मक नाटिका )

— ४ —

तांबे आणि त्यांची कविता

( विस्तृत प्रबंध )

# चवथीचा चांद

( शिशुगीतांचा सचित्र संग्रह )

कवि—भवानीशंकर श्री. पंडित

किंमत ८ आणे

ट. ख. निराळा

लिहा:—

—मुलांचें मासिक कार्यालय—

नवी शुक्रवारी, नागपूरशहर.

# संकलित प्रकाशनें

— १ —

कृष्णेच्या खोऱ्यांत

( प्रादेशिक वर्णनात्मक खंडकाव्य )

— २ —

दंहिवर

( स्फुट कवितांचा कलाप

— ३ —

कुणाल कांचना

( मुक्त छंदात्मक नाटिका )

— ४ —

तांबे आणि त्यांची कविता

( विस्तृत प्रबंध )

# चवथीचा चांद

( शिशुगीतांचा सचित्र संग्रह )

कवि—**भवानीशंकर श्री. पंडित**

**किंमत ८ आणे**

ट. ख. निराळा

लिहाः—

**—मुलांचें मासिक कार्यालय—**

नवी शुक्रवारी, **नागपूरशहर.**